बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३६ | बुधवार,दि. १६ ऑगस्ट २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# नुसताच घोषणांचा पाऊस; अंमलबजावणीचे काय?

## एसटी महामंडळाचा विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळ

**सुरेश भदाडे**

**देवरी** - सध्या राज्यातच नव्हे तर देशभर घोषणांचे नुसताच पाऊस पडताना दिसतो. परंतु, या घोषणांची वास्तविक अंमलबजावणी किती आणि कशी होते, यावर एकाही राजकारण्यांना वा सत्ताधाऱ्यांना लक्ष द्यायला वेळ नाही. यात राज्य परिवहन महामंडळ कसे बरे मागे राहणार? विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या-येण्यासाठी नियमित बसफेऱ्या वेळेत उपलब्ध करून देण्यात महामंडळ अपयशी पडले आहे. परिणामी, देशाचे भविष्य असलेल्या विद्यार्थ्यांच्या जीवणाशी खेळ चालला असून भावी पीढीचे आयुष्य उद्धस्त करण्याचा हा डाव तर नाही ना? असा प्रश्न ग्रामीण भागातील पालक वर्गाने सरकारला केला आहे.



संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी एका गावावरून दुसऱ्या गावी ये-जा करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळामार्फत सवलतीच्या दरात पास उपलब्ध करून दिल्या जाते. विद्यार्थिनींना तर मोफत प्रवास उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने शहर वा तालुकास्थळी शिक्षण घेण्यासाठी जात असतात. असे असले तरी सर्वच विद्यार्थ्यांना त्यांचे स्वगाव-वरून बस उपलब्ध असेलच असे नाही. तर कित्येक विद्यार्थ्यांना त्यांचे राहत्या ठिकाणावरून मुख्य मार्गावर यावे लागते.

विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, म्हणून राज्य सरकारच्या वतीने मानव विकास योजनेतून परिवहन महामंडळाला निळ्या बसेसचा पुरवठा सुद्धा केला. असे असले तरी विद्यार्थ्यांना आज ही एसटी महामंडळाच्या लहरीपणाचा फटका सोसावा लागत आहे. परिणामी, महामंडळाच्या या भोंगळ कारभाराचा विद्यार्थ्यांच्या भविष्यावर दूरगामी परिणाम होणे स्वाभाविक आहे. नियमित आणि वेळेवर जर बस उपलब्ध होत नसेल तर विद्यार्थी शिक्षणापासून वंचित तर होतातच, शिवाय त्यांच्या शारीरिक स्वास्थ्यावर सुद्धा परिणाम होताना दिसतो.

गोंदिया जिल्ह्यातील बराचसा भाग जंगलग्रस्त आहे. यामुळे विद्यार्थी विशेषत: विद्यार्थिनींना मुख्य मार्गावर येताना वा सायंकाळी परतीच्या वेळी वेळेत बस मिळाली नाही तर प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. त्यांच्या मनात अनामिक भीती सुद्धा निर्माण होते. या प्रकारामुळे दुर्गम भागातील मुली आजही बाहेर गावी शिक्षण घेण्यापासून वंचित आहेत. या बाबीकडे राज्यकर्त्यांनी लक्ष देण्याची फार मोठी आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील गुणवत्ता आजच्या युगात प्रभावीत होता कामा नये, अशी मागणी पालकवर्ग आज करताना दिसतो.



देवरी-आमगाव मार्गावर तर ही समस्या फार गंभीर बनल्याचे बोलले जात आहे. या मार्गावरील कारुटोला, तेलीटोला, हरदोली, सोनारटोला, डोंगरगाव, सावली, लोहारा, मुल्ला, वडेगाव, बोरगाव येथील विद्यार्थी शाळा महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी देवरी येथे ये-जा करीत असतात. या विद्यार्थ्यांनी सायंकाळी ३ ते ५.३० या दरम्यान नियमित बसफेऱ्या नाहीत. जर एखादी बस उपलब्ध झालीच तर या बसमध्ये विद्यार्थ्यांना गुराढोरांप्रमाणे कोंबून वाहतूक केल्या जात असल्याचा आरोप विद्यार्थी-पालकांनी केला आहे. यामुळे विशेषतः विद्यार्थिनींना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. यासारखीच परिस्थिती कमीअधिक प्रमाणात सर्वत्र असल्याची माहिती समोर आली आहे. क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशी भरल्याने भविष्यात एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही.

या गंभीर समस्येकडे सत्ताधाऱ्यांसह सर्वच पदाधिकाऱ्यांनी लक्ष देऊन ही समस्या मार्गी लावण्याची मागणी पुढे आली आहे. याबाबीकडे शासनाने दुर्लक्ष केल्यास मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा सुद्धा नागरिकांनी दिला आहे.

# शेतकरी हवालदिल; शेतजमिनीला पडल्या भेगा, पावसाने दडी मारल्याने धानाचे पीक धोक्यात

**गोंदिया:** जुलै महिन्यात संततधार पावसानंतर गत आठवडाभरापासून पावसाने दडी मारली आहे. पावसाच्या सरासरीत घसरण झाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांची धान रोवणी आटोपली असताना पाऊस बेपत्ता झाल्याने धान रोवणी सुकण्याच्या मार्गावर आहे. येणारा आठवडाही कोरडा गेला तर, पीक हातातून जाण्याची शक्यता आहे. पावसाअभावी जमिनीला भेगा पडण्याची सुरुवात झाली आहे.

पऱ्यांची वाढ जोमाने व्हावी म्हणून सेंद्रिय व रासायनिक खत पिकांना दिले जाते. मात्र शेतात पाणी नसल्याने खत देण्यास व्यत्यय येत आहे. त्यामुळे पिकांची वाढ ही एक प्रकारे खुंटली आहे. सिंचनाची सोय असणारे शेतकरी मोटारद्वारे पाण्याची व्यवस्था करून पऱ्हे जिवंत ठेवत आहेत. मात्र कोरडवाहू शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. त्यांनी आपल्या शेतामधील पऱ्हे जगावे कसे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. आता पावसाने दडी मारल्याने पावसाची सरासरी घसरली आहे. १ जून ते १२ ऑगस्टपर्यंत सरासरी ५०० मिमी पाऊस होणे अपेक्षित होते.

यामुळेच शेतकऱ्यांच्या माथी चिंतेच्या रेघोट्या दिसत असून त्यांच्या नजरा आकाशाकडे लागून आहेत. पावसाने दडी मारल्यामुळे मात्र तुटीतील फरक दिवसेंदिवस वाढत चालला असून, सोमवारी (दि.१४) हा फरक सरासरी ३८२ मिमीवर पोहोचला होता.

यंदा जून महिन्यात पावसाने दगा दिल्याने आणखी तीन महिने पावसाचे आहेत हा विचार करुन शेतकरी समाधानी होता. त्यानंतर जुलै महिन्यात पावसाने साथ दिली. मात्र, पाहिजे तेवढा पाऊस जुलै महिन्यातही बरसला नाही. अशात मागील वर्षीच्या तुलनेत यंदा पाऊस बरसला नसल्याने तूट पडली. ती तूट कायम असून ऑगस्ट महिन्यात सुरुवातीचे चार दिवस पावसाने दमदार हजेरी लावल्याने ही तूट काही प्रमाणात कमी झाली व शुक्रवारी (दि.४) सरासरी ७८ मिमीवर आली होती. मात्र, दुसऱ्याच दिवसापासून म्हणजेच ५ ऑगस्टपासून पावसाने दडी मारली असून, मधामधात फक्त सरी बरसल्या आहेत.

नियमित पाऊस बरसत नसल्यामुळे मात्र जिल्ह्यातील पावसाची ही तूट दररोज वाढत चालली असून सोमवारी (दि.१४) ही तूट सरासरी ३८२ मिमीवर पोहोचली होती. विशेष म्हणजे, रविवारी रात्री पावसाने हजेरी लावली त्यातही फक्त काही वेळच पावसाच्या सरी बरसल्या. एवढ्या पावसाने काहीच फरक पडणार नसून जिल्ह्याला आता नितांत गरज आहे ती दमदार पावसाची. असे न झाल्यास ही तूट आणखी वाढत जाणार व अशातच पावसाळा निघून जाण्याची भीती आहे. यामुळेच शेतकरीच नव्हे तर अवघे जिल्हावासीय मदेवा, आता तरी अंत पाहू नको, अशी आर्त हाक आकाशाकडे बघून देत आहे.



### मागील वर्षी होता पूर, यंदा मात्र ठणठणाटच

**मागील १५ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात झडीचा पाऊस बरसत होता व त्या दमदार पावसामुळे जिल्ह्यात पूरस्थिती होती. संततधार पावसामुळे पावसा-पावसातच स्वातंत्र दिन साजरा करावा लागला होता. यंदा मात्र जिल्ह्यात विपरीत परिस्थिती दिसत आहे. यंदा पाऊस नसून पाण्याची नितांत गरज आहे.**

### कोरडा दुष्काळ जाहीर करा

**ऑगस्ट महिना अर्धा लोटला असला तरीही पावसाचा ताळमेल काही जमता जमत नसल्याची स्थिती आहे. पाऊस नसल्यामुळे जमिनीला भेगा पडल्या असून पिके वाळू लागली आहेत. अशीच स्थिती राहिली तर खरिपाचा हंगाम शेतकऱ्यांच्या हातून जाण्याची भीती आहे. आता फक्त सप्टेंबर महिना उरला असून तोवर मात्र पिके हातची गेली असणार आहे. अशात जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.**

### सोमवारी फक्त १.५ मिमी सरासरी पाऊस


**५ ऑगस्टपासून जिल्ह्यात पावसाने दडी मारली असून, फक्त पावसाच्या हलक्या सरीच बरसल्या आहेत. हाच प्रकार रविवारी (दि.१३) सायंकाळी घडला. सायंकाळी पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. सोमवारच्या आकडेवारीनुसार फक्त १.५ मिमी सरासरी पाऊस बरसल्याची नोंद घेण्यात आली आहे. या पावसाची काहीच मोजदाद नसून त्याचा काहीच उपयोग नाही. उलट सोमवारी त्यामुळे उकाड्यात वाढ झाली.**

### रोवणी सुकण्याच्या मार्गावर

**रोवणी आटोपून जवळपास पंधरा दिवस झाले आहेत. रोवणीनंतर धानाला पाण्याची गरज असते. परंतु पावसाने दडी मारल्यामुळे झालेली रोवणी सुकण्याच्या मार्गावर असून शेतजमिनीला भेगा पडण्याची सुरुवात झाली आहे.**

### पावसाअभावी उकाडा वाढला

**पाऊस दहा दिवस लांबल्याने तापमान वाढले आहे. तापमान ३४ अंशावर गेले आहे. पावसाअभावी उकाडा वाढला असून नागरिक घामाघूम होत आहेत. वाढत्या उकाड्यामुळे येत्या दोन दिवसांत पाऊस बरसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ऑगस्ट महिन्यात उकाड्याचा पाऊस बरसला नाही तर डासांचा प्रकोप वाढतो. पावसाच्या दडीमुळे डासांचा उपद्रव जास्त वाढला असून दवाखान्यात गदी दिसून येत आहे. अशातच मलेरिया व डेंग्यूसारखे आजार बळावले आहेत.**





## शिकवणी वर्गाच्या ३ शिक्षकांचा धरणात बुडून मृत्यू

**गोंदिया :** गोंदियातील एका खासगी शिकवणी वर्गात शिक्षक असलेले तीन शिक्षक तमांगता धरण येथे १५ ऑगस्ट रोजी सहलीसाठी गेले होते. यातील चौघांपैकी तिघांचा धरणात बुडून मृत्यू झाल्याची घटना १५ ऑगस्टला सायंकाळच्या सुमारास घडली.

राजनांदगाव पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार मृतकांमध्ये एन. मिश्रा रा. भिलाई, अरविंद सर रा. उत्तर प्रदेश आणि अतुल कडू रा. नागपूर असे या घटनेतील मृतकांची नावे आहेत. गोंदियातील सिद्धिविनायक शिकवणी वर्गात शिकवत असताना गोंदियात वास्तव्याला असलेले सदर शिक्षक मूळचे यातील एक शिक्षक नागपूर, एक भिलाई आणि एक उत्तर प्रदेश येथील असल्याचे सांगण्यात येत आहे. या बुडालेल्या तिघांचे मृतदेह राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन पथकाने धरणाच्या बाहेर काढून राजनांदगाव पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन आणि १६ ऑगस्ट पतेती या सणानिमित्त लागोपाठ दोन दिवस सुट्टीचे आल्याने गोंदियातील सिद्धिविनायक शिकवणी वर्गाचे तीन शिक्षक भिलाईतील शिक्षक मित्राच्या आमंत्रणावर राजनांदगाव येथील मांगता धरणावर सहलीसाठी गेलेले होते.

# जिल्ह्यात विकासाच्या नव्या आशा आकांक्षाची पायाभरणी-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे

**गोंदिया :** सर्वसामान्य जनता, शेतकरी व समाजाच्या सर्व घटकांच्या विकासासाठी राज्य शासन कार्य करीत आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग आता नागपूरपासून गोंदिया पर्यत वाढविण्यात येणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमीत्त वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवास मोफत. महिलांना एसटी प्रवासात सरसकट ५० टक्के सुट. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये. शेतकऱ्यांना केवळ १ रुपयात पीक विमा. राज्यातील सर्व नागरिकांना १५ ऑगस्टपासून प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयात मोफत उपचार मिळणार आहेत. अधिकाधिक जमीन सिंचनाखाली आणण्याचा तसेच प्रलंबीत प्रकल्प पूर्ण करण्याचे लोककल्याणकारी निर्णय राज्य सरकारने घेतले आहेत. राज्यात व आपल्या जिल्ह्यात प्रगती आणि विकासाच्या नव्या आशा व आकांक्षाची पायाभरणी या निमित्ताने झाली असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले.

पोलीस मुख्यालय मैदान कारंजा, गोंदिया येथे आयोजित स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य ध्वजारोहण कायक्रमात ते बोलत होते. जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर जिल्हाधिकारी प्रकाश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, सन २०२२-२३ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील ग्रामीण भागात विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे राज्यात प्रथम येण्याचा बहुमान गोंदिया जिल्ह्याने पटकविला आहे. जिल्ह्यातील ८ तालुक्यात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करण्यात आले असून सदर दवाखान्यात नागरिकांना मोफत संदर्भसेवा पुरविण्यात येत आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०२३-२४ मध्ये शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरुन पीक विमा योजनेचा लाभ देण्याकरीता "सर्वसमावेशक पीक विमा योजना' राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख ३७ हजार ४६६ शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे. एक रुपयात पीक विमा देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करणारी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना यशस्वीपणे राबविली आहे. या योजनेत जिल्ह्यातील २७ हजार ८७४ शेतकरी पात्र ठरले असून त्यापैकी २२ हजार ९५३ शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत ७३ कोटी ४५ लाख रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

गोंदिया जिल्हा धान उत्पादक जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे. शासकीय आधारभुत किंमत धान खरेदी योजनेअंतर्गत खरीप पणन हंगाम २०२२-२३ मध्ये ११६ धान खरेदी केंद्रामार्फत १ लाख १२ हजार ९४६ शेतकऱ्यांकडून ३९ लाख ९८ हजार ६११ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली. त्याची आधारभुत किंमत ८१५ कोटी ७१ लाख रुपये आहे. शासनाकडून ८१५ कोटी ७१ लाख रुपये प्राप्त झाले असून ८१५ कोटी ३ लाख रुपये शेतकऱ्यांना अदा करण्यात आले.

आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प देवरी अंतर्गत एकलव्य आश्रम शाळेतील १८ विद्यार्थी जेईई मेन परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. यावर्षी ३२ विद्यार्थी सीईटी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. ३० विद्यार्थ्यांना गव्हर्नमेंट इंजिनियरींग कॉलेजमध्ये प्रवेश मिळालेला आहे, ही जिल्ह्यासाठी गौरवाची बाब असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले.

शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा क्रांती योजना व राष्ट्रीय कृषि विकास कार्यक्रम या तिन्ही योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सिंचन विहिरीचा लाभ देण्यात येतो. सन २०२२-२३ मध्ये जिल्ह्यात १०० टक्के अनुदानावर अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांच्या २४१ सिंचन विहिरी पुर्ण करण्यात आल्या असून शेतकरी आपले उत्पादन वाढविण्याकरीता या योजनेचा लाभ घेत असल्याचे ते म्हणाले.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत २०२२-२३ मध्ये १२७ कि.मी. लांबीचे डांबरीकरण पूर्ण करण्यात आले असून त्यावर ६१ कोटी ४८ लाख रुपये खर्च करण्यात आले आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सन २०२२-२३ मध्ये ८७.६५ कि.मी.ची ४५ कामे पूर्ण करण्यात आलेली असून त्यावर ७३ कोटी ८८ लाख रुपये निधी खर्च करण्यात आलेला आहे.

सामाजिक बांधिलकी पूर्ण करण्याच्या उद्देशाने पोलीस दादलोरा खिडकी योजनेअंतर्गत निर्धुर चुलीचे वाटप, शालेय साहित्य वाटप, आरोग्य शिबीर, रोजगार मेळावे, महिला बाल सुरक्षितता व समुपदेशन, जनजागृती मार्गदर्शन शिबीर, सायकल वाटप, कृषि मार्गदर्शन शिबीरे व धान्यबीज वाटप, कृषीपंप वाटप, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण, नक्षल विरोधी जनजागृती मार्गदर्शन शिबीर, वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना लागणारे विविध प्रकारचे दाखले, प्रमाणपत्र तयार करुन देणे इत्यादी उपक्रम घेण्यात आले आहेत. या उपक्रमाद्वारे पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवाद दृढ होत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. (उर्वरित पान ४ वर)

# दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी

## १७ ऑगस्टला जिल्हास्तरीय शिबीर,अध्यक्ष बच्चू कडू यांच्या हस्ते उद्घाटन



**गोंदिया :** "दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' अभियानाअंतर्गत १७ ऑगस्ट रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मरारटोली, गोंदिया येथे जिल्हास्तरीय शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

राज्यात ६ जून २०२३ पासून राबविण्याचे शासन स्तरावरुन ठरविण्यात आलेले आहे. या अभियानाचे अध्यक्ष व मुख्य मार्गदर्शन आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चु कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत हे शिबिर होणार आहे.

"दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' अभियानांतर्गत विविध विभागांमार्फत दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिव्यांग व्यक्तींपर्यंत पोहोचावी तसेच योजनांचा लाभ दिव्यांगांना एकाच ठिकाणी मिळावा यासाठी जिल्हास्तरीय शिबीराचे आयोजन १७ ऑगस्ट रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मरारटोली, गोंदिया येथे करण्यात आलेले आहे. या एक दिवसीय शिबीरामध्ये आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चु कडू हे स्वतः उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते या अभियानाचे उद्घाटन सकाळी ११.०० वाजता करण्याचे आयोजिले आहे.

सदर अभियानामध्ये प्रत्येक विभागास स्टॉल उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यामध्ये विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतची माहिती व प्रचार प्रसिध्दी करण्यात येणार असून पात्र दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्ज त्याच ठिकाणी भरुन घेण्यात येणार आहे. त्याकरिता शिबिरामध्ये येणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र (णऊखऊ प्रमाणपत्र), आधार कार्ड, आयु संबंधी प्रमाणपत्र (जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला), पासपोर्ट फोटो ०३, उत्पन्नाचा दाखला (खपलेोश उर्शीीेंळषळ-लरींश) इत्यादी आवश्यक दाखले मुळ प्रमाणपत्रांसह सोबत घेवून यावे व जास्तीत जास्त दिव्यांगांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद संजय गणवीर यांनी केले आहे.

# विज जोडणी अभावी तिन वर्षापासून धुळखात पडली आहे तिन करोडची ईमारत

**सुरेंद्रकुमार ठवरे**

**अर्जुनी मोरगांव:** स्थानिक पंचायत समितीची नवीन इमारत तीन वर्षापासून बनवून तयार आहे. तीन कोटी रुपये निधीतून इमारत रंगरंगोटी करून सुसज्ज उभी आहे. मात्र गेल्या तीन वर्षांपासून विद्युत जोडणी अभावी या इमारतीचे लोकार्पण होऊ न शकल्याने सध्या ही सुसज्ज इमारत धूळखात पडली आहे.



अर्जुनी मोरगाव पंचायत समितीची स्थापना सन १९६२ ला करण्यात आली. तेव्हापासून इंग्रजकालीन असलेल्या इमारतीमध्ये तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतीचा कारभार सुरू आहे. इमारत पूर्णता जर्जर झाली असताना ठिकठिकाणी या इमारतीला गळती सुद्धा लागली होती. मागील चार-पाच वर्षापासून जुन्या इमारतीला प्लॅस्टिकचा आधार घ्यावा लागत होता. अशा परिस्थितीतही पंचायत समितीचे कामकाज सुरू होते.

दरम्यान अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे तत्कालीन आमदार व माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांचे विशेष पुढाकाराने तीन-चार वर्षापूवी पंचायत समितीच्या नवीन इमारत बांधकामासाठी ३ कोटी ७० लाखाचा निधी मंजूर करण्यात आला होता. या नवीन इमारत बांधकामा चे भूमिपूजन सुद्धा माजी मंत्री राजकुमार बडोले यांचे हस्ते करण्यात आले होते. त्यानंतर पंचायत समितीच्या जुन्या इमारतीला पाडून नवीन इमारतीच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली. जुनी इमारत पडल्यानंतर पंचायत समितीचा संपूर्ण कामकाज पंचायत समितीच्या मागच्या बाजूला असलेल्या लहान मोठ्या खोल्यांमध्ये तर बचत भवन व उमेद च्या कार्यालयात हलविण्यात आले. तर सभापती उपसभापती व सदस्यांसाठी स्वच्छता गृह नसलेल्या जुन्या षटकोणी इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात व्यवस्था करण्यात आली. आज पावसाळ्याचे दिवस असताना अनेक विभागातील खोल्यांमध्ये पावसाची गळती सुरू आहे. सुसज्ज अशा नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन तीन वर्षाचा कालावधी लोटला आहे मात्र विद्युत जोडणीचे काम अद्यापही शिल्लक आहे. परिणामी सदर नवीन इमारतीचे लोकार्पण होऊ शकले नाही केवळ विद्युत जोडणी अभावी तीन कोटीची ही नवीन इमारत तीन वर्षापासून धुळखात पडली असून लोकार्पणाचा मुहूर्त केव्हा निघणार असा प्रश्न निर्माण झाला आहे

**पंचायत समितीची निवडणूक होऊन आज दीड वर्षाचा कालावधी झाला. नवीन इमारत बनून तीन वर्ष झाली .आम्ही दीड वर्षांपूवी पहिल्याच सभेत नवनिर्मित पंचायत समिती इमारतीच्या विद्युत जोडणी संदर्भात व लोकार्पण संदर्भात ठराव जिल्हा परिषद कडे पाठविले व सतत पाठपुरवठा करीत आहोत. कुणीतरी गोंदिया येथील कंत्राटदाराला विद्युत जोडणीचे कंत्राट झाले असल्याची माहिती आहे. लगेच वीज जोडणी चे काम झाल्यावर लोकार्पण करू**

**होमराज पुस्तोडे उपसभापती पंचायत समिती अर्जुनी मोरगाव.**

**अर्जुनी मोरगाव पंचायत समितीच्या नवनिर्मित इमारतीच्या वीज जोडणीचे टेंडर झालेले आहेत. व लगेच करारनामा करण्याचे काम युद्धपातळीवर सुरूआहे. वीज जोडणीचे काम येत्या चार-पाच दिवसात सुरूकरण्यात येईल. व लगेच लोकार्पण सुद्धा करू**

**यशवंत गणवीर उपाध्यक्ष जिल्हा परिषद गोंदिया.**

सााप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि. १६ ऑगस्ट २०२३


## संपादकीय

# महिला आणि स्वातंत्र्य

आज आपण ७६ वा स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. आज सगळीकडे उत्साहाचं आणि आनंदाचं वातावरण पाहायला मिळतंय. ब्रिटिश राजवटीतून भारताला स्वातंर्त्य मिळालं आणि आपण गुलाम गिरीतून मुक्त झालो. पण खरा प्रश्न हा आहे की, आपला देश तर स्वतंत्र झाला पण या देशातील प्रत्येक महिला स्वतंत्र झाली आहे का? तिला तिचं स्वातर्त्य मिळालं आहे का? ती तिचं स्वतंत्र आयुष्य जगत आहे का? तिला तिच्या विचारांचं स्वातंत्र्य मिळालं आहे का? हा प्रश्न प्रत्येक स्त्रीच्या मनात कधी ना कधी येतच असेल की, मी आणि माझं स्वातंत्र्य नक्की आहे तरी काय?

कधी मुलगी तर कधी पत्नी, कधी आई तर कधी ताई, तर कधी प्रेयसी, अशी सगळी रूपं एका स्त्रीमध्ये आपल्याला दिसतात. आयुष्यातले हे सगळे रोल निभावत असताना तिला तिचं स्वातंत्र्य दिलं जातंय का? तर हो, काही प्रमाणात, काही ठिकाणी महिलांना स्वातंत्र्य दिलं जात आहे. याच मिळणाऱ्या स्वातंत्र्यामुळे महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. "चूल आणि मूल' ही संकल्पना बाजूला ठेवून चूल-मूल विथ करिअर ही संकल्पना चालू केलीः मी, माझं घर, माझा संसार, माझी माणसं या चौकटीत न राहता, न अडकता मिळालेल्या स्वातंत्र्यातून एक गरुडझेप घ्यायला सुरुवात केली.

आता स्वातंत्र्य म्हणजे नक्की काय? त्याची व्याख्या काय? तर स्वातंत्र्य म्हणजे स्वतःच्या स्वप्नांना, स्वतःच्या इच्छांना पंख देण्यासाठी, ती पूर्ण करण्यासाठी सक्षम असणं. तिच्या विचारांवर कोणतही बंधन न लादता, तिला आपल्या दबावाखाली न ठेवता, तिला तिच्या इच्छेप्रमाणे जगू देणं हेच खरं स्वातंत्र्य आहे.

रूपेरी पडद्यावर झळकणारी ग्लॅमर स्त्री असो, वा राजकारणातील प्रभावशाली स्त्री असो. लष्करी दलातील धाडसी स्त्री असो, वा कॉपीरेट क्षेत्रामधील बुद्धिमान स्त्री असो. या सगळ्याच क्षेत्रात महिलांनी आपल्याला जे जगण्याचं आणि विचारांचं स्वातंत्र्य मिळालं आहे, त्या स्वातंत्र्यामुळे आपलं एक स्थान निर्माण केलं आहे. आजची स्त्री दुसऱ्यांचे विचार आपल्यावर न लादता, कोणत्याही बंधनात न अडकता आपली स्वप्नं पूर्ण करीत आहे. याचाच अर्थ असा आहे की, महिलांना स्वातंत्र्य दिलं जात आहे आणि ही बाब आपल्या समाजासाठी आणि आपल्या देशासाठी खूप चांगली आहे.

आज अनेक महिला सक्षम आहेत. हळूहळू का होईना सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. विशेषतः मुंबई आणि दिल्लीसारख्या शहरात महिलांच्या स्थितीत, राहणीमानात, विचारात खूप बदल झालेला आहे. रात्री -अपरात्री आवश्यक कामासाठी घराबाहेर पडू लागल्या आहेत. वाटलं तर बुरखा घालेन आणि वाटलं तर बिकीनी घालेन, हे ठरवू शकतात. "मी, माय बॉडी, माय वे' हे देखील अगदी बिनधास्तपणे बोलत आहेत. आपले विचार, मत बिनधास्तपणे मांडत आहेत. स्वतःच्या हक्कासाठी लढा देत आहेत. मात्र नाण्याची दुसरी बाजूदेखील आहे. आजही काही महिलांचं स्वातंत्र्य हिसकावून घेतलं जात आहे. त्यांना त्यांचं स्वतंत्र आयुष्य जगू न देता कुणाच्या तरी दडपणाखाली आयुष्य जगावं लागत आहे. मुलीने कोणते कपडे घालावेत, कसं बोलावं, काय करावं काय नाही या सगळ्या गोष्टी शिकवल्या जात आहेत. त्यावर बंधनं घातली जात आहेत. शिक्षणाचा अधिकार हिसकावून घेतला जात आहे. ग्रामीण भागात तर आजही एखाद्या महिलेला उंबरठ्याबाहेर पडताना कोणाची तरी परवानगी घ्यावी लागतेय. त्यामुळे आज आपण कितीही महिलांची प्रगती पाहत असलो, महिला स्वतंत्र, महिला सक्षमीकरण यावर जरी बोललो तरी आज अनेक महिला आपलं स्वतंत्र आयुष्य जगू शकत नाहीत, ही देखील तितकीच खरी गोष्ट आहे.

महिलांनी आणि मुलींनीदेखील आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग हा आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी करावा. कोणत्याही परिस्थितीत न जुमानता आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने आपल्या ध्येयापर्यंत पोहोचावंःघाबरणं वगैरे सोडून द्यावं आणि एखादी गोष्ट पटत नसेल तर "नो मिन्स नो' बोलायला शिकावं. तुमच्या जगण्यावर आणि तुमच्या स्वातंत्र्यावर खऱ्या अर्थाने फक्त आणि फक्त तुमचाच अधिकार असायला पाहिजे.

# समाजभूषण दादासाहेब कोठेकर (वेणी कोठा) जि.यवतमाळ



सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

यवतमाळ जिल्ह्यातील आताच्या कळंब तालुक्यातील गाव वेणी कोठ होय. या गाव-ातील सात्वीक शेतकरी असलेल्या नागोजी कोठेवर यांच्या पोटी २८ फेब्रुवारी १८७३ ला गोपाळराव कोठेकर यांचा जन्म झाला. पुढे त्यांना समाजभूषण दादासाहेब कोठेकर वकील म्हणून ओळखले जायचे. वयाच्या आठव्या वर्षानंतर गावातील मराठी शाळेत त्यांचे नाव दाखल करण्यात आले. इ.स. १८८५ साली ते मराठी पाचवी पास झाले. १८८७ साली ते यवतमाळ येथील मिडल स्कूलच्या प्रवेश परीक्षेत वळले व त्यांचा पहिला नंबर पटकावल्यामुळे त्यांना दरमहा चार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली. या हुशारीचा परिणाम म्हणजे त्यांचे नाव इंग्रजी शाळेत दाखल करण्यात आले. त्याकाळी हायस्कूलची परीक्षा अमराववतीला होत असे. तेथे ते १००-१२५ विद्यार्थ्यांतून पहिल्या क्रमांकाने वऱ्हाडातून पास झाले व त्यांना त्याकाळी ६ रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली. १८९३ साली कोठेकर मराठीच्या परीक्षेत बसले अमरावती व अकोला दोन्ही हायस्कूलमधून प्रथम येवून त्यांनी १० रुपयांची स्कॉलरशीप मिळविली. त्यकाळी मुंबई हीच युनिर्व्हसिटी असल्यामुळे तेथे जाऊन एल.एल.बी.ची परीक्षा दयावी लागायची मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेतेही ते यशस्वी झाले. आणि त्यांना तेथे ही शिष्यवृत्ती मिळाली. (दादासाहेब कोठेक यांचे जीवनचरित्र, लेखक ल.ना.तागडे यांनी अमरावती ऑक्टोबर-नोव्हेंबर १९४३)

पण त्यांना कॉलेजात जावून एल.एल.बी. करता आली नाही. त्याकरिता खाजगी रितीने अभ्यास केला. अमरावतीस त्यांना त्यांचे मित्र तुकारामजी होरे रा.हिवरे (धनगर समाजाचे) यांनी तीन वर्षात साठ (६० रुपयांची) मदत केली. दाभा येथील वामनराव देशपांडे यांनी १५० (दिडशे) रुपयांची मदत केली. १९०० साली त्यांनी परीक्षेची तयारी केली. पण दुष्काळपडून सर्वत्र निराशाजनक परिस्थिती निर्माण झाली. त्याचवेळी यवतमाळचे ई.ए.सी. मिस्टर एम.पी.वॉल्श बार ॲटला यांनी नोकरी सोडून व वकीलीचा धंदा चालू केला होता. त्यांच्याकडे ते काम करु लागले. १९०४ साली त्यांनी वकीलीची परीक्षा दिली आणि १००-१२५ विद्यार्थ्यांपैकी फक्त दोन विद्यार्थी पास झाले. त्यात एक गोपाळराव उर्फ दादासाहेब कोठेकर होते. १९०५ चे जानेवारीपासून त्यांनी यवतमाळ येथे वकीलीचा धंदा सुरु केला. पण फक्त पैसा कमविणे त्यांचा उद्देश नव्हता, देशसेवा, समाजसेवा ही उद्देश होता.

इ.स. १९०६-०७ सालचे सुमारास बंगालचे फाळणीचा प्रश्न उपस्थित झाला. सर्वत्र खळबळ माजली त्याचा परिणाम दादासाहेब कोठेकर यांच्यावर झाला. येथेच कोठेवर यांच्या देशसेवेच्य कार्याची मुहूर्तमेठ रोवली गेली. त्या काळात खेडोपाडी बिगारीचा भयंकर जुलूम चालू होता. पाटील, पटवारी व अधिकारी यांचा शेतकऱ्यांना त्रास होत होता. म्हणून पूर्ण विचारांनी त्यांनी शेतकऱ्यावरील होणारा जुलूम व अन्याय नाहीसा करण्याकरिता ई.स. १९१० सालापासून मोहीम सुरु केली. तिथे काम सतत १९२४ पावेतो नेटाने स्वत: चालवून सर्व साधारण होणाऱ्या बिगारी जुलूमाचा नायनाट केला (संदर्भ उपरोक्तप्रमाणे).

आता राजकीय अन्यायाची चीड असणारे दादासाहेब यांना सामाजिक अन्यायाची चीडली दिसली. सामाजिक गुलामगिरी दिसली. भोळ्या शेतकऱ्यावर क्षणोक्षणी होणाऱ्या भिक्षुशाहीचा धार्मिक अण्यायही त्यांना पहा-वला नाही. म्हणून त्यांचे लक्ष इ.स.१९१० पासून ब्राम्हणेत्तर चळवळीकडे गेले. सतत बारा वर्षे ते समाजजागृतीचे कार्य करीत राहिले. पुढे इ.स.१९३६ पासून ते काँग्रेस सभासद झाले. नंतर त्यांच्यावर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव राहिला. ते यवतमाळ काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष बनले. तेथून त्यांनी खादी वापरण्यास सुरुवात केली.

इ.स.१९१० साली त्यांच्या अध्यक्षतेखाली एक प्रचंड सभा झाली. त्या सभेच्या प्रकरणी १०८ प्रमाणे त्यांच्यावर केस भरुन त्यांची वकीलीची सनद रद्द करण्याचे बजावले गेले. माफी मागण्याचे सांगितल्या गेले. परंतु दादासाहेबांनी माफी मागण्याचे साफ नाकारले. याचाच परिणाम म्हणजे त्यांच्यावर अमरावती कोर्टात केस चालविली गेली. त्यांचे वकील पत्र दादासाहेब खापर्डे यांनी घेतले. पण त्याचा निकाल दासासाहेब कोठेकर यांच्या विरुद्ध लागून त्यांची वकीलीची सनद दोन वर्षासाठी रद्द करण्यात आली. १९९६ साली अमरावती येथे स्थापन झालेल्या विदर्भ माळी शिक्षण संस्थेचे ते मोठे आधारस्तंभ होते. शैक्षणिक कार्यात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना समाजभूषण ही पदवी देण्यात आली होती.

अ.माळी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीकरिता पुणे येथे अखिल भारतीय माळी शिक्षण परिषदेचे पहिले अधिवेशन इ.स. १९१० साली मुंबईचे कॉन्ट्रॅक्टर सेठ धोंडूजी पंडुजी बनकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यानंतर इ.स. १९११ साली सदर परिषदेचे दुसरे अधिवेशन मुंबईत भरविण्यात आले. त्यावेळी भगवंतराव बाळाजी कांडलकर (करजगाव)यांची अध्यक्षपदाकरिता निवड करण्यात आली. या सभेला दाद-ासाहेब कोठेकर स्वत: हजर होते. तेव्हापासून पुढे होणाऱ्या प्रत्येक अधिवेशनाला हजर राहिलेत. तन, मन, धनाने कार्य करणाऱ्या दाद-ासाहेब यांच्याकडे परिषदेचे जनरल सेक्रेटरी पद आले. ११ जुलै १९२६ रोजी पुणे येथे झालेल्या १५ व्या बैठकीचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. या भाषणात त्यांनी परिषदेची जरुरी,एक राष्ट्रवादी सत्वान मदत, माळी समाजाचा वसा इत्यादी बाबीवर प्रकाश टाकला. सदरहू भाषण पश्चिम विदर्भातील शिलेदारांची भाषणे, प्रा.डॉ. संतोष बन्सोड व डॉ. किशोर वानखडे यांनी संपादीत केलेल्या पुस्तकात प्रकाशीत केलीत. तसेच ब्राम्हणेत्तर परिषदेतील रामगाव रामेश्वर ता. दारव्हा येथील १७ मे १९२७ चे भाषण, दादासाहेब कोठेकर यंचे व्याख्यान १९ मे १९२७ व जेथे जवळकरांच्या स्फोटक यवतमाळ येथील भाषणाचे वेळी ते अध्यक्ष होते. ते भाषण याच पुस्तकामध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. (आजींक्य प्रकाशन, वाशीम) अकोला जिल्हा ब्राम्हणोत्तर परिषद अधिवेशन तिसरे, बृहिश्-वरखेड येथे इ.स. १९२६ ला झाले होते. ३० व ३१ डिसेंबर रोजी झालेल्या थिंडार (महान) येथील परिषदेत दादासाहेब कोठेकर, नानासाहेब अमृतकर, गोविंदराव प्रधान, रावसाहेब निंबोळकर, देव वकील, अण्णासाहेब कायंदे, आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील, व्यंकटराव गोंडे यांच्या समवेत उपस्थित होते.

१९२६ ला मोर्शी येथे झा-लेले भाषण दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांनी श्री दादासाहेब कोठेकरांचे मोर्शी येथील व्याख्यान या मथळ्याखाली प्रकाशीत केले होते. दिनमित्र ता.१८ माहे ऑगस्ट १९२६, अंक ४१ पृ.७) त्यांनी म्हटले वऱ्हाडात अत्यंत शुद्ध मनाने राष्ट्रसेवा करणारे श्री. दादासाहेब कोठेकर वकील अहेत. त्यांच्या या भाषणाणा विषय होता. ब्राम्हणेत्तर राजकीय चळवळ, यामध्ये त्यांनी आपण स्वराज्य पक्षात काम केले. या संबंधिचे अनुभव सांगितले. ब्राम्हणांचा ब्राम्हणोत्तर चवळवळी-वर अराष्ट्रीय चळवळ म्हणून असणारा आक्षेप खोडून काढला. ब्राम्हणांच्या स्वार्थी वृत्तीमुळे मी स्वराज्य पक्ष सोडून ब्राम्हणेत्तर पक्षात काम करण्यास आले आहे. असेही त्यांनी सांगितले. या पक्षात ब्राम्हणेत्तरांनी कितीही कामे केली तरी त्यांना ब्राम्हण सुत्रधार वर डोके काढू देत नाहीत. त्यांचा यशाचा वाटा मिळू देत नाही. यावेळी त्यांनी आपले अनुभव मोठ्या पोटतिडकीने व्यक्त केले होते.

त्यांच्या कारकिर्दीच्या इ.स. १९१६ साली अमरावती येथे वऱ्हाड मध्यप्रांत माळी शिक्षण संस्थेची श्रीमान दादासाहेब नारायणराव आन्याजी तडस यांच्या नेतृत्वाखाली स्थापना करण्यात आली होती. या संस्थेचे बरेच दिवसापर्यंत दादासाहेब कोढेकर हे मुख्य चिटणीस होते. समाजातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांस शिष्यवृत्या देवून त्यांना मदत केली होती. इ.स.१९३९ साली वऱ्हाड मध्यप्रांत क्ष. माळी शिक्षण संस्थेने अमरावती येथे छात्रालयाच्या इमारतीचे काम हाती घेतल्यानंतर समाजभूषण दादासाहेब कोठेकरांनी त्याकाळी एकशे एक्कावन रुपयांची देणगी दिली होती. त्यांचे योगदान म्हणून आनंदराव तडस सभागृहात त्यांना मोठा फोटो संस्थेतर्फे लावण्यात आला होता. दोनदा ते अ.भा.क्ष.माळी शिक्षण व राजकीय परिषदांचे अध्यक्ष होते. (संदर्भ ल.ना.तायंडे (लेख१, ज्योतीप्रकाश मासिक अमरावती, ऑक्टोबर-नोव्हेंबर १९४३, पृ.११०) क्षत्रीय माळी शिक्षण संस्था जि.अमरावती ऑफीस यांच्या १९२२-२३ च्या कार्यकारी मंडळाचे ते अध्यक्ष होते. अमरावती जिल्हा क्षत्रीय माळी शिक्षण परिषद बैठक पहिली परिषद दर्यापूर तालुक्यातील कापुसतळणी येथे १ व २ जून १९२२ रोजी दिवसा रा.गोपाळराव नागोजी कोठेकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. जोराचा पाऊस असूनही यास गर्दी होती. यावेळी निरनिराळ्या जातीतील मंडळी सुद्धा उपस्थित होती. (क्षत्रीय माळी पुढरी वर्ष ३ रे ऑक्टोबर १९२२, अंक १ ला) १९२४ सालच्या यवतमाळ येथील घटना मंडळाचे ते सेक्रेटरी होते.

समाजभूषण गोपाळराव उर्फ दादासाहेब कोठेकर यांचे २७/४/१९४९ ला वयाच्या ७६ वर्षी निधन झाले. जोधपूर येथे झालेल्या माळी शिक्षण परिषदेचेही ते अध्यक्ष होते. माळी शिक्षण परिषद, स्वराज्य पक्ष, ब्राम्हणेत्तर पक्ष व काँग्रेस अशी त्यांनी कारकिर्द राहिली. ते स्वभावाने अत्यंत सरळ, प्रेमळ व निगर्वी होते. एक निष्ठावान देशभक्त व शिक्षणात मागासलेल्या जनतेचा कुशव पुढारी म्हणून त्यांचे कार्य होते. आज मात्र यवतमाळमध्ये त्यांच्या वंशजाचा शोध घेतला असता काहीही माहिती मिळत नाही.

# प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा

**गोंदिया :** प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन १४ ऑगस्ट रोजी महिला आर्थिक विकास महामंडळ कार्यालयातील सभागृहात जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हिंदुराव चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आले. सदर कार्यक्रमाला जिल्हा नोडल अधिकारी (PMFME) तथा कृषि उपसंचालक धनराज तुमडाम, कृषि अधिकारी पवन मेश्राम, सचिन कुंभार (जिल्हा आर्थिक सल्लागार स्मार्ट), भौदीप सहारे (जिल्हा संसाधन व्यक्ती), पुस्तकला खैरे (जिल्हा संसाधन व्यक्ती) इत्यादी मार्गदर्शक तसेच तालुका कृषि अधिकारी (सर्व), मंडळ कृषि अधिकारी (सर्व), कृषि पर्यवेक्षक (सर्व), जिल्हा संसाधन व्यक्ती (सर्व), कृषि सेवक गोंदिया, FLO तथा तंत्र सहायक उपस्थित होते.




प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. या कार्यशाळेच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना याकरिता विविध विभागातील तज्ञ सदर कार्यशाळेमध्ये मार्गदर्शनाकरिता आमंत्रित करण्यात आले होते. यानंतर जिल्हा नोडल अधिकारी धनराज तुमडाम यांनी योजनेम धील विविध घटक वैयक्तिक व गट लाभाथी, सामाईक पायाभुत सुविधा, मार्केटिंग व लीरपवळपस याबाबत माहिती दिली. तसेच ज्या लाभार्थ्यांचे प्रकल्प आराखडे बँक स्तरावर प्रलंबीत आहेत ते संबंधित अधिकारी-कर्मचारी यांचे सनियंत्रण करण्यात आले. यानंतर जिल्हा संसाधन व्यक्ती पुष्पा खैरे यांनी गटाचे अर्ज कशाप्रकारे करायचे व केलेल्या अर्जाची माहिती तसेच त्यांनी केलेल्या प्रकल्पाची यशोगाथा प्रकल्प नोंदणी पासून ते थेट मुंबई, दिल्ली येथील बाजारपेठ कशाप्रकारे साध्य केले याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले, जिल्हा संसाधन व्यक्ती भौदीप सहारे यांनी सामाईक पायाभूत सुविधा cif या विषयाचे सविस्तर प्रकल्पासाठी लागणारे कागदपत्र व इतर माहिती दिली. यानंतर AIF विषयाचे संपुर्ण मार्गदर्शन सचिन कुंभार (जिल्हा आर्थिक सल्लागार स्मार्ट ) यांनी केले.

सदर जिल्हास्तरीय कार्यशाळेला गोंदिया जिल्ह्यातील योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असणारे लाभार्थी, महिला शेतकरी, बँकेकडे प्रस्ताव प्रलंबीत असलेले लाभार्थी, महिला आर्थिक विकास महामंडळ मधील गटातील महिला शेतकरी, कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी, सर्व तालुका कृषी अधिकारी, सर्व मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहायक, तंत्र सहायक, पुरुष व महिला शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करुन उपस्थितांचे आभार कृषी सेवक लक्ष्मी डहाके यांनी मानले

## पैशांची परतफेड न करणाऱ्या महिलेवर लैंगिक अत्याचार, तिघांवर बळजबरीचा गुन्हा

**गोंदिया :** उधार उसनव-ारी घेतलेल्या पैशांची परतफेड न करणाऱ्या एका ४२ वर्षांच्या महिलेवर तीन नराधमांनी आळीपाळीने लैंगिक अत्याचार केल्याची घटना गोंदिया तालुक्यातील सतोना येथे घडली. यासंदर्भात रावणवाडी पोलिसांनी तीन नराधमांवर बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. त्या तिन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

मुलाच्या उपचारांसाठी सप्टेंबर २०२१ मध्ये गावातीलच ४२ वर्षांच्या पीडित महिलेने आरोपींकडून उधार उसनव-ारी पैसे घेतले होते. ते पैसे ती परतफेड करू शकली नाही. त्या मोबदल्यात दोन आरोपी तिच्यावर नेहमीच आळीपाळीने अत्याचार करायचे. आरोपी देवेंद्र उर्फ बंडू नगारची मानकर (५०) व राजू ढिमरू मानकर (४८) दोन्ही रा. सतोना हे सप्टेंबर २०१२ पासून मार्च २०२३ या काळात दोन आरोपी तिच्यावर लैंगिक अत्याचार करायचे. कधी शेतात तर कधी घरी तिला फोन करून बोलवायचे आणि तिच्यावर अतिप्रसंग करायचे. तिने टाळण्याचा प्रयत्न केल्यास तिला फोनवर आरोपी धमकी द्यायचे.

९ ऑगस्ट रोजी तिला रात्री ८:११ वाजता तिला शेतातील उसाच्या वाडीत नेऊन तिच्यावर अत्याचार केला. हा सर्व प्रकार नेहमी पाहणारा आरोपी अशोक भगळू मरठे (५०) रा. सातोना यानेही तिला फोन करून शरी-रसुखाची मागणी केली. पीडित महिलेच्या तक्रारीवरून तिघांवर रावणवाडी पोलिसांनी भादंविच्या कलम ३७६ (ड), ३७६ (२), (एन), ३५४ (अ), ४५०, ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. तपास सहायक पोलिस निरीक्षक अभिजित भुजबळ करीत आहेत.

# गोरेगाव तालुकास्तरीय विज्ञान मेळावा उत्साहात



**गोरेगाव:-**परशुराम विद्यालय मोहगाव/बु. येथे तालुकास्तरीय अ. भा. विज्ञान मेळाव्याचे उद्घाटन बी.डब्ल्यु.कटरे (मुख्याध्यापक परशुराम विद्यालय मोहगाव/बु.) यांच्या अध्यक्षतेखाली गटशिक्षणाधिकारी एन.जे.सिरसाटे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पंचायत समितीचे वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी एम.डी.पारधी विज्ञान मेळाव्याचे परीक्षक व BRC गोरेगा-वचे विषय साधनव्यक्ती भास्कर बाहेकर,ओमप्रकाश ठाकरे आणि तालुक्यातील शाळांतील विज्ञान शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील विविध शाळांतील २७ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेऊन चार्टस व ईतर दृक साहित्यांचा आधार घेत दिलेला विषय विद्यार्थ्यांनी स्पष्ट करून सांगितले. तसेच परीक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. विद्यार्थ्यांची १० गुणांची लेखी चाचणीही घेण्यात आली.गटशिक्षणाधिकारी एन जे सिरसाटे यांनी स्पर्धकांना वैज्ञानिक दृष्टीकोणाची रुजवणूक करण्याचे आवाहन केले.शिक्षण विस्तार अधिकारी एम.डी.पारधी यांनी मेळावा नियमांची माहिती देऊन विद्यार्ध्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्याध्यापक बी.डब्ल्यु.कटरे यांनी समयोचित मार्गदर्शन करत स्पर्धकांना प्रोत्साहीत केले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व बक्षिस वितरण मुख्याध्यापक बी.डब्ल्यु.कटरे तसेच गट साधन केंद्र गोरेगाव विषय साधनव्यक्ती व मेळाव्याचे परीक्षक यांच्या हस्ते करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे परीक्षण शिक्षकवृंद यू.आर.टेंभरे, आर.वाय.गजभिये व एन.एस.राणे यांनी केले.

सदर मेळाव्या मध्ये प्रथम क्रमांक नवप्रतिभा हायस्कूल दवडीपारचा विद्यार्थी मानस मोटघरे व द्वितीय क्रमांक श.जा. ति.जि.प.हायस्कूलचा विद्यार्थी इशांत हरीणखेडे याने पटकावला. तर हरिदास भवरजार हाय. गणखैराची विद्यार्थिनी कु. ट्विंकल पारधी ही तिसऱ्या कमांकाची मानकरी ठरली.

कायक्रमाचे प्रास्ताविक विषय सााधनव्यक्ती व विज्ञान मेळावा समन्वयक भास्कर बाहेकर यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन व सर्व उपस्थितांचे आभार प्रदर्शन विषय साधनव्यक्ती ओ.एस.ठाकरे यांनी केले.मेळाव्याच्या आयोजनात प्रामुख्याने परशुराम विद्यालय मोहगाव/बु. येथील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी उत्स्फूर्तपणे सहकार्य केले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि आम्ही

## वीरांच्या त्यागाची आणि समर्पणाची सर्वांना जाणीव आहे काय?



या वर्षी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजेच ७६ वा वाढदिवस आपण आनंदाने देशभरात साजरा करीत आहोत. ही प्रत्येक भारतीयासाठी सम ाधानाची बाब आहे.

असंख्य वीरांच्या बलिदानानंतर आणि लाखो लोकांच्या त्यागामुळे आपणाला आज हा सुखद दिवस पाहायला मिळाला आहे. त्या लोकांनी जो संघर्ष केला, विरोध पत्करला, कुटूंबाकडे दुर्लक्ष केले, म्हणून आज आम्ही आमच्या कुटूंबासोबत सुखाने झोपत आहोत. त्यांनी जर इंग्रजी सत्तेविरुध्द निकराने लढा दिला नसता तर आज जे लोक सत्तेचा आस्वाद घेत आहेत त्यांना तो मिळाला नसता. त्यामुळे या स्वातंर्त्य सेनानींचे आम्हा प्रत्येक भारतीयावर अनंत उपकार आहेत.ते आमच्याकडून कधीही फिटणार नाही.

त्यामुळे स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिलेल्या या वीरांच्या त्यागाची आणि समर्पणाची आम्ही सर्वांनी जाणीव ठेवली पाहिजे.

तसेच आज ७६ वा स्वातंत्र्य दिन जरी आम्ही आनंदाने साजरा करीत असलो, तरी तो साजरा करण्यासारखी परिस्थिती सध्या देशात आहे का यावरही प्रत्येकाने चिंतन केले पाहिजे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची जी स्वप्ने आमच्या सेनानींनी पाहिली होती ती खरोखर पूर्ण झालेली आहे का? भारताने धर्मनिरपेक्ष राष्ट्राची संकल्पना स्विकारली होती. सर्व धर्माच्या लोकांना धार्मिक स्वातंत्र्य बहाल करण्यात आले होते. धर्माच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही हे संविधानकर्त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. परंतु आज तशी परिस्थिती आहे का यावरही मंथन झाले पाहिजे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाची अवस्था फार बिकट होती. शिक्षण हे फक्त मोठ्या शहरांमधेच आणि तेही मर्यादित स्वरुपात होते. ग्रामीण भागातील जनता शिक्षणापासून जवळपास वंचीत होती. आमच्या महापुरुषांनी ही समस्या ओळखली. ग्रामीण भागात शिक्षण पोहचले पाहिजे म्हणून त्यांनी आटोकाट प्रयत्न करुन गावखेड्यापर्यंत शाळा, महाविद्यालये सुरु केली. त्यामुळे ग्रामीण भागापर्यत शिक्षणाच्या सुविधा पोहचल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या अनेक महापुरुषांनी बहुजनांच्या शिक्षणाची सोय केली. त्यांच्या कष्टामुळे आणि समर्पित वृत्तीमुळे बहुजन समाजाला स्वाभिमान आणि अस्मितेची जाणीव झाली. आज बहुजन समाजातील लोक सर्वच क्षेत्रात मोठमोठया हुद्यांवर विराजमान झालेले आहेत.

परंतु आमच्या महापुरुषांच्या संघर्षाची आणि त्यागाची मात्र त्यांना जाणीव दिसत नाही. साडी, माडी आणि गाडी यामधे ही उच्चशिक्षित मंडळी इतकी रममाण झालेली आहे की त्यांना आपल्या अवतीभवती काय सुरु आहे याकडे लक्ष द्यायलाही वेळ नाही. शो-षणवादी व्यवस्थेची ही मंडळी वाहक झालेली आहे.

या देशाला जगविणारा अन्नदाता अत्यंत विदारक अवस-थेमधे आहे याच्याशी त्याला काही देणेघेणे नाही. कष्करी, कामकरी, शेतकरी यांच्या आंदोलनाविषयी तो आपले मतही व्यक्त करीत नाही आणि सहभागीही होत नाही.

देशाला स्वातंत्र्य मि ळविण्यासाठी ज्यांनी संघर्ष केला त्यांचे स्मरण करणे हा केवळ आता एक सोपस्कार झाला आहे.आमच्या महापुरुषांच्या विचारांना आम्ही पूर्णतः तिलांजली दिली आहे. त्यांच्या विचारांवर चालणे तर दूरच पण ते विचार समजून घ्यायलाही आम्हाला फुरसत नाही. आमची जबाबदारी, कर्तव्ये आम्ही पूर्णपणे विसरलेलो आहे. आम्हाला फक्त हक्क आणि अधिकारच माहित आहे. परंतु हे हक्क आणि अधिकार सुध्दा ज्या संविधानाने आम्हाला बहाल केले, त्या संविधानाविषयी आम्ही कधी साधी चर्चाही करत नाही.

ज्या संविधानाने आम्हाला सर्व प्रकारचे स्वातंर्त्य बहाल केले, त्या संविधानाबद्दल आम्हाला कोणतीही आस्था आणि आपुलकी नाही. सुशिक्षित समजणाऱ्या अनेकांनी तर देशाचे संविधानही पाहिले नाही. ज्या संविधानावर हा देश चालतो व जे संविधान आम्हाला जीवन जगण्याच्या संधी बहाल करतो, त्या सर्वोच्च ग्रंथाबद्दल त्याच्या लाभार्थ्यांनाच एवढी अनास्था असणे यापेक्षा दुसरा कृतघ्नपणा कोणता असू शकतो?

जगातील सर्वश्रेष्ठ लोकशाही म्हणून मान्यता असलेल्या भारतीय लोकशाहीची अमूल्य मूल्ये पायदळी तुडविली जात असतांना उच्चशिक्षित वर्ग मुक्याची आणि बहिऱ्याची भूमिका घेतो. सरकारी स्वायत्त संस्थांचे वेगाने अवमूल्यन होत असतांना आम्ही मूकदर्शक बनतो. एकमेव आशा असलेली न्यायसंस्थाही बड्या लोकांच्या बाजूने झुकत असतांना आम्ही तथाकथित सुशिक्षित लोक बोलायला, लिहायला घाबरतो.मग सुशिक्षित, उच्चशिक्षित असण्याचा उपयोग तरी काय ?

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव धुमधडाक्यात साजरा होत असतांना स्वतंत्र भारताचे स्वतंत्र विचाराचे नागरीक म्हणून आम्हाला जगता येईल का यासाठी आमचा प्रयत्न असणे आवश्यक आहे. स्वतःच्या मेंदूने चिकित्सक विचार न करता केवळ दुसऱ्यांच्या विचारांचे मूक वाहक होणे म्हणजे जीवंत असूनही मृत असल्यासारखेच आहे. आम्ही या देशाचे नागरीक आहोत. स्वातंत्र्यानंतर झालेल्या सुधारणांमधे येथील प्रत्येक व्यक्तीचा काही ना काही वाटा नक्कीच आहे. त्यामुळे राज्यकर्ते कोणत्याही पक्षाचे असो, त्यांना प्रश्न विचारण्याचा आमचा अधिकार आम्ही जरुर वापरला पाहिजे. आमचा प्रश्न विचारण्याचा अधिकार आम्ही कोणाच्याही चरणी गहाण ठेवता कामा नये. भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यासारख्या क्रांतीकारांनी इंग्रजांना प्रश्न विच-ारले म्हणून आम्हाला आज प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळाला. परंतु हा महत्वपूर्ण अधिकारच जर आम्ही गमावून बसलो तर पुन्हा आम्हाला गुलामगिरीच्या वाटेने जावे लागेल.असे जर झाले तर तो समस्त स्वातंर्त्य सेनानींच्या बलिदानाचा अपमान ठरेल.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतांना आम्ही या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करणे हीच खरी सर्व शहीदांना आदरांजली ठरेल.

**प्रेमकुमार बोके**
अंजनगाव सुजी, ९५२७९१२७०६

# जिल्ह्यातील समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांचा एक दिवसीय लाक्षणिक संप

**गोंदिया :** जिल्हा परिषद अहमदनगर येथील समग्र शिक्षा कर्मचारी प्रसाद पोळ (जिल्हा समन्वयक समावेशित शिक्षण) हे आपल्या न्याय्य मागणीसाठी म.प्रा.शि.प.मुबई येथे १४ ऑगस्ट पासून आमरण उपोषण करीत आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी गोंदिया जिल्ह्यातील समग्र शिक्षा समवेशीत शिक्षण विभाग व सर्व कर्मचाऱ्यांनी देखील एक दिवसाचा लाक्षणिक उपोषण आंदोलन करुन पोळ यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.



या एक दिवसीय लाक्षणिक संपात राज्यातील सर्वच सम्रग शिक्षा अभियानातील कर्मचारी सहभागी झाल्याने शिक्षण विभागातील कामकाज ठप्प पडले होते. आंदोलनकर्त्यांनी प्रसाद पोळ यांचेमार्फत संदर्भीय पत्र आणि केलेल्या अर्जावर त्यांना वैद्यकीय खर्चाचा निधी मिळावा. समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा देयके/ क्लेम प्रतिपूर्तीची तरतूद करण्यात यावी. जिल्हा समन्वयक या पदाचे वेतन मिळावे. वेतन श्रेणीनुसार व सुधारित वेतन श्रेणी घेत असलेल्या कर्मचारी याप्रमाणे समग्र शिक्षा अभियान अंतर्गत सर्व कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना वेतन लागू व्हावे. कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे सेवा पुस्तक ठेवणे रद्द केले आहेत ते पुन्हा चालू करणे. सर्व कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची पाच ते सहा वर्षापासून वेतन वाढ झालेली नाही ती फरकासह मिळावी. जिल्हा समन्वयक पदाला SCRT पुणे या कार्यालयातील समन्वयक पदाची वेतन श्रेणी द्यावी. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आयुक्त नवी दिल्ली यांच्या पत्रानुसार समग्र शिक्षा अभियानातील सर्व कर्मचाऱ्यांचे भविष्य निधी निर्वाह योगदान चालू करण्यात यावे व प्रथम नियुक्ती पासून होणारे योगदान हे आपल्या कार्यालयाने द्यावे. महिला कर्मचारी यांना सहा महिन्याची प्रसूती रजा मंजूर करणे व ज्या महिला प्रसूतीनंतर तीन महिन्यानी कर्तव्यावर रुजु झाल्या आहेत त्यांना तीन महिन्याचे अतिरिक्त वेतन देण्यात यावे.

समग्र शिक्षा अभियानातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या अहर्तेनुसार नोकरीत सामावून घ्यावे. समावेशित शिक्षण अंतर्गत प्राथमिक स्तरावर कार्यरत विशेष शिक्षकांना सन २०२२-२३ साठी देय असलेला पण अद्यापही अप्राप्त असलेला फरकाचा निधी तसेच २०२३-२४ साठी देय असलेला फरक निधी रु १५०० प्रतिमाह प्रमाणे म.प्रा.शि.प.मुबई स्तरावरुन विना विलंब मिळावा या मागण्याकंडे लक्ष वेधण्यात आले होते.

# अनाथांची सेवा हेच परमोधर्म मानून समाजसेवा करणाऱ्या सविता बेदरकर यांचे कार्य खूप मोलाचे-स्मिता बेलपत्रे

### एकल महिला व अनाथ मुलांना धान्य, जीवनोपयोगी सामान व शैक्षणिक साहित्य वाटप

**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यात अनाथांची माय म्हणून ओळख असलेल्या समाजसेविका प्रा. डॉ. सविता बेदरकर यांनी आपले संपूर्ण जीवन या गोंदिया भंडारा जिल्ह्यातील अनाथ मुलांसाठी वाहून दिले आहे. अनाथांची सेवा हेच परमोधर्म मानून समाजसेवा करणाऱ्या सविता बेदरकर यांचे कार्य खूप मोलाचे आहे असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी केले आहे. त्या सविता बेदरकर यांचे निवासस्थानी जिल्ह्यातील एकल महिला व अनाथ मुलांना धान्य, जीवनोपयोगी सामान व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीमध्ये गोंदिया विधानसभा क्षेत्राचे आमदार विनोद अग्रवाल यांच्या पत्नी सविता अग्रवाल, सामाजिक कार्यकर्ता भरत क्षत्रिय, LIC चे विकास अधिकारी अविनाश ठाकूर, सेवानिवृत्त शिक्षक प्रा. अनिल मेश्राम, ज्येष्ठ पत्रकार अमरचंद ठवरे उपस्थित होते.



दरवर्षी डॉ. सविता बेदरकर या अनाथ मुलांसाठी व कोरोना काळात एकल झालेल्या महिलांसाठी धान्य, तेल व इतर जीवनोपयोगी साहित्य व शैक्षणिक लेखन साहित्य वाटपाचे कार्यक्रम वर्षातून दोनदा आपल्या पहादी पारी कुपार लिंगो बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित करतात. त्या समाजातील अनेक दानशूर व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून, सोशल मीडियाच्या माध्यमातून धान्य व इतर वस्तू देण्याबाबत आवाहन करतात व त्यांच्या आवाहनाला समाजातील लोकं या चिमण्या पाखरांना बळ देणेसाठी भरभरून सविता बेदरकर यांच्या संस्थेला दान देतात.

'इस हात से ले और इस हात से दे' या म्हणीप्रमाणे सविता बेदरकर यांच्याद्वारे या अनाथ मुलांना वर्षभर पुरेल इतके धान्य व जीवनोपयोगी साहित्य व मुलांना शैक्षणिक लेखन साहित्याचे वाटप वर्षातून दोनदा (एक सत्र सुरू होतांनी व दिवाळीत नवीन कपडे, नास्ता, धान्य) केले जाते. म्हणजेच समाजाकडून घेऊन समाजालाच अर्पण केले जाते. त्यामुळेच त्यांना अनाथांची माय म्हणून संबोधले जाते. या कार्यात त्यांना अनेक सामाजिक संघटना व पदाधिकाऱ्यांचा देखील सहकार्य मिळतो. 'समाज देनेके लिये बैठा है, सिर्फ मांगनेवाले हात और नियत साफ होना चाहीये' याप्रमाणेच ही अनाथांची माय या गोंदिया परिसरात कार्य करीत आहे. त्यामुळे त्यांना भरभरून प्रतिसाद मिळतो आहे.

सविता बेदरकर यांना मदत करणाऱ्या दानदात्यांमध्ये आमदार विनोद अग्रवाल, सीए.धिरज अग्रवाल, सहयोग क्रेडिट कॉपरेटिव्ह सोसायटी चे जयेश रामादे, कालू भालोटिया, साई इंटरप्राईजेस चे लारोकर, भरत क्षत्रिय, वैशाली कोहपरे, नानन बीसेन, इंजिनिअर सुनील तोरणे, यशोदा सोनवणे, भरत फेंडर, रत्नेश डहाट, प्रवीण बुराण, राकेश टेंभरे, बालू भोयर, विजय पाऊलझगडे, जयश्री गावंडे , प्रवीण बोरकर, वंदना लांजेवार, अथर्व बहुउद्देशीय संस्था, धनपाल कावळे, भुपेंद्र बोरकर,प्रा. नीता खांडेकर, गणेश मुनिश्वर,सीमा डोये, ॲड.प्रमोद फुंडे, डॉ.छाय लंजे, LIC विकास अधिकारी अविनाश ठाकूर, मंदा गायधने व इतर सर्व दानदाते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवानिवृत्त शिक्षक अनिल मेश्राम यांनी केले. या कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्रसंचालन कवयित्री सरिता सरोज (कु. कल्याणी डहारे) यांनी तर आभार प्रदर्शन पत्रकार अमरचंद ठवरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुनीता भेलावे, प्रिया हरडे (सोनेवाने), प्रीती जेवठे, मंजू शिवंनकर, प्राची गुडधे, सरिता गजभिये, कैलाश भेलावे, वशिष्ठ खोब्रागडे, विश्वजीत बागडे, धर्नेद्र भुरले व इतर सहकारी यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्र उभारणीसाठी लोकचळवळ गरजेची-अप्पर पोलीस अधीक्षक बनकर



**अर्जुनी मोरगाव:-** राष्ट्रपिता महात्मा गांधींनी इंग्रजांविरुद्ध लढा उभारला तेव्हा सविनय कायदेभंग आंदोलन लोकचळवळ बनले होते त्यामुळे राष्ट्र उभारणीसाठी लोकचळवळ गरजेची आहे, असे प्रतिपादन गोंदिया जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांनी (ता.१४) केले.

तालुक्यातील पवनी/धाबे येथे आयोजित राष्ट्रीय कार्यक्रम, "माझी माती माझा देश" या कायक्रमात मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच पपीता नंदेश्वर या होत्या.

मंचावर नवेगावबांधचे ठाणेदार संजय पांढरे, उपसरपंच पराग कापगते, ज्येष्ठ नागरिक सुनीता टेम्भूरणे, शिवाजी कमरो, विठ्ठल आदमने, हरी इष्कापे, सर्व मुख्याध्यापक आणि ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. श्री बनकर यांनी माझी माती माझा देश या कार्यक्रमाची जोरदार स्तुती करून हा एक अभिनव उपक्रम असल्याचे सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, आपलं व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी शुक्ष्म निरीक्षणाची गरज असते. भारत जम्मू काश्मीर पासून ते कन्याकुमारी पर्यन्त विस्तीर्ण असा पसरला आहे. तेव्हा आपल्या राष्ट्रावर प्रेम करण्यासाठी अश्या कार्यक्रमांची नितांत गरज आहे असा युक्तिवाद त्यांनी केला. भारत माझा देश आहे ही प्रतिज्ञा म्हणजे सर्वच विविध फुलांना एकाच माळेत गूंफुंण त्यांची जी माळ तय्यार होते त्या प्रमाणेच आपला देश आहे. असे ते म्हणाले.

यावेळी शीलाफलकाचे अनावरण त्यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय शपथ वदवून घेण्यात आली. श्री बनकर यांनी पवनी /धाबे इथल्या मूठभर मातीचे कलश सरपंच श्रीमती नंदेश्वर आणि उपसरपंच कापगते यांच्या स्वाधीन केले. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आला. दरम्यान उपस्थित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि पादत्राने वितरित करण्यात आले. हे साहित्य किरण मोरे यांनी उपलब्ध करून दिली. याप्रसंगी देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. हा कार्यक्रम ग्रामपंचायत पवनी /धाबे आणि गोंदिया जिल्हा पोलीस विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला. या प्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक श्री बनकर आणि पवनी /धाबे एओपीचे पोलीस उपनिरीक्षक जनाब अजरुद्दीन शेख यांचा शाल श्रीफळ आणि पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक उपसरपंच श्री कापगते यांनी, संचालन ग्रामसेवक पृथ्वीराज कोल्हटकर यांनी आणि आभार श्री शेख यांनी मानले. यावेळी गावातील नागरिक आणि विद्याथी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्धापनदिनी गुणवंत विद्यार्थांचा सत्कार



**गोरेगांव:** येथील पी.डी.राहांगडाले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव येथे ७६ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून सत्र २०२२-२३ या सत्रातील ईयत्ता दहावी व बारावीत राज्य बोर्डाच्या परीक्षेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले. विद्यार्थ्यांना ग्यानीरामभाऊ देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट गोरेगाव तर्फे पुरस्कार, निर्मल कॉम्प्युटर गोरेगाव, आयसेक्ट कॉम्प्युटर गोरेगाव व अनंदाबाई फगलाल बघेले स्मृतिपुरस्कार, स्व.डोमाजी पटले स्मृतिपुरस्कार, तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक डी डी राहांगडाले यांच्यातर्फे पुरस्कार देण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्राम हिता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.टी. पी.येडे, उद्घाटक सचिव ॲड.टी. बी. कटरे, बक्षिस वितरक संचालक यू.टी.बिसेन होते. या कार्यक्रमाला सेवानिवृत केंद्र प्रमुख बी.डी.पटले, डी.डी.रहांगडाले, प्राचार्य वाय. आर. चौधरी, प्रा.सी.डी.मोरघडे, दुर्गाप्रसाद राहांगडाले, पालकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे संचालन एस आर मांढरे व सी आर बिसेन यानी केले तर आभार ए एस बावनथडे यानी मानले.

**गुणवंत विद्यार्थी-** वर्ग १०वा प्रथम मुस्कान सुरेश राहांगडाले ,द्वितीय हिना भुमेश्वर पारधी , तृतीय उज्वल राधेश्याम कटरे, चतुर्थ श्रद्धा शैलेश येल्ले.

वर्ग १२ वी विज्ञान प्रथम लक्ष्मीकांत राहांगडाले व नितू बिसेन, द्वितीय लिना कटरे, तृतीय सावन पाखमोडे, चतुर्थ पुजा मस्के, वर्ग १२ वी कला प्रथम डॉली शेंडे, द्वितीय भाग्यश्री बोपचे,तृतीय प्रिंसी लांजेवार, चतुर्थ निकीता वाघाडे.

या सर्व प्राविण्य प्राप्त प्रज्ञावंत विद्याथीचे पाहुण्यांच्याहस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

# एक्यूट पब्लिक शाळेत ७७ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**गोंदिया:** - एक्यूट पब्लिक शाळेत स्वतंत्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. केंद्रशासनाचा आदेशान्वये दि. १३ ऑगस्ट आणि १४ ऑगस्ट ला "आजादी का अमृत महोत्सव" कार्यक्रमांतर्गत "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्यात आला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांगता सोहळा अंतर्गत शाळेच्या प्रांगणात पंचप्रण शपथविधी कार्यक्रम घेण्यात आले. १५ ऑगस्ट २०२३ रोजी मंगळवारला शाळेच्या प्रांगणात ध्वजारोहन कार्यक्रम पार पाडण्यात आले. शाळेच्या संपूर्ण परिसर भारत माता, की जय, तिरंगे झंडे की जय च्या घोषणाने गुंजन उठले. या कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांनी गीत, समूहगाण, भाषण, नृत्य व रंगारंग कार्यक्रम सादर केले. वर्ग १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी सावन झूलाचे कार्यक्रम प्रर्दशित केले.



या प्रसंगी संज्योत बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रेरणास्त्रोत श्रीमती गीताताई भास्कर,संस्थेचे सचिव संजय भास्कर, सहसचिव श्रीमती एस. शुभा, शळेचे मुख्याध्यापक श्रीमती उज्जवला, उप प्राचार्य कापगते उपस्थित होते. तसेच आजच्या कार्यक्रमाला लाभलेल्या प्रमुख अतिथि सौ. मोहिनी वरहाडे. उपास्थित होते. कार्यक्रमाला पालक वर्ग, शिक्षकवृंद, विद्यार्थी व शिक्षणकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाला सर्वांचे योगदान लाभले.

# गोंदिया वैद्यकीय महाविद्यालयात आठवडाभरात १३ रुग्णांचा मृत्यू

**गोंदिया :** गोंदिया वैद्यकीय महाविद्यालयात आठवडाभरात १३ रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. हे मृत्यू अपघात, आकस्मिक कारणांनी झाल्याचा दावा रुग्णालय प्रशासनाने केला आहे.

याबाबत वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता कुससुमाग्रज घोरपडे म्हणाले, जिल्हाभरातून अनेक व्यक्ती उपचारासाठी येथील वैद्यकीय महाविद्यालयात येत असतात. अपघात, आकस्मिक मृत्यूसह इतर अनेक कारणांमुळे मागील आठवड्यात मृत्यूसंख्या वाढली.

मागील सात ते आठ दिवसात सर्पदंशामुळे २, विषबाधेने २, किडनी आजाराचे ४, अपघातात ३, ट्रेन समोर उडी मारल्याने १ महीला, गंभीर आजारामुळे १, अशा एकूण १३ लोकांचा मृत्यू झाला आहे.

**-कुससुमाग्रज घोरपडे,** अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय

# मॉडेल कॉन्वेंट एण्ड सायन्स ज्यू. कॉलेज गोरेगांव मध्ये माजी सैनिक यांच्या हस्ते ध्वजारोहण



**गोरेगांव :-** मॉडेल कॉन्वेंट एण्ड सायन्स ज्यू. कॉलेज गोरेगांव मध्ये संस्था सचिव प्रा.आर. डी. कटरे, यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रशासकीय अधिकारी सी. बी. पटले, प्राचार्य सौ. सी. पी. मेश्राम, पर्यवेक्षक कु.एस.डी.चीचामे यांच्या उपस्थितीत माजी सैनिक यशवंतराव वालीचार यांच्या हस्ते स्वातंर्त्य दिनाचे औचित्य साधून ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंर्त्यदिन निमित्त विद्यार्थ्यांकडून विविध कार्यक्रम गीत, नृत्य, भाषण, वेषभूषा असे कार्यक्रम सादर करण्यात आले.

कार्यक्रमाला उपस्थित ध्वजारोहक, अध्यक्ष महोदय यांनी स्वतंत्रविराच्या योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एच.एस.सी. व एस. एस. सी. परीक्षेत प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करून आभार प्रदर्शनाने करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्माचारि यांनी सहकार्य केले.

## ई-निविदा
## ग्रामपंचायत कार्यालय बेरडीपार (का.)
### पंचायत समिती तिरोडा, जि.प.गोंदिया

**निविदा क्रमांक-०१** दिनांक ११/०८/२०२३

ग्रामपंचायत कार्यालय बेरडीपार (का.), पंचायत समिती तिरोडा, जि.प.गोंदिया कडून सन २०२३-२४ ह्या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या विविध योजनेच्या बांधकाम विकास कामाकरीता साहीत्या पुरवठा, पंजीकृत पुरवठा धारक यांचे कडून ई-निविदा व्दि लीफाफा पद्धतीने ई-निविदा अटी व शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत आहेत. ई-निविदेचा विस्तृत नमुना व निविदा सादर करण्याचा कालावधी पत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्तळावर उपलब्ध असून विस्तृत माहिती ग्रामपंचायत कार्यालयता उपलब्ध आहे.

**ई-निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिद्धी | दिनांक.११/०८/२०२३ |
| २ | ई-निविदा दस्तावेज डाऊनलोड प्रारंभ | दिनांक.११/०८/२०२३ |
| ३ | ई-निविदा दस्तावेज डाऊनलोड समाप्ती | दिनांक.१७/०८/२०२३ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ४ | ई-निविदा दाखल करण्याची सुरुवाती दिनांक | दिनांक.११/०८/२०२३ |
| ५ | ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक.१७/०८/२०२३, सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ६ | ऑनलाईन ई-निविदा उघडण्याची दिनांक | दिनांक.१८/०८/२०२३ सायं.५.०० वाजता (शक्य झाल्यास) |

**अटी व शर्ती:-** ई-निविदेचा विस्तृत नमुना व निविदा सादर करण्याचा कालावधी पत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्तळावर उपलब्ध असून विस्तृत माहिती ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे.

**सरपंच**
ग्रामपंचायत कार्यालय बेरडीपार (का.)

**ग्राविअ ग्रामसेवक**
ग्रामपंचायत कार्यालय बेरडीपार (का.)

## ग्रामपंचायत कार्यालय नवनीतपुर पंचायत समिती अर्जुनी/मोर.
## जाहीर निविदा सुचना (पहिली वेळ)

ग्रा.पं.नवनीतपुर जा.क्र.६४/२०२३
दिनांकः-१४/०८/२०२३

ह्या सुचनेद्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, मासिक सभा ठराव क्र.१० दिनांक ११/०८/२०२३ अन्वये ग्रामपंचायत नवनीतपुर येथे १५ वा वित्त आयोग निधी (जि.प.स्तर) अंतर्गत कामाकरीता मोहरबंद दोन लिफाफा पद्धतीने अनुसुची ब-१ प्रमाणे (टक्केवारी दराने) ऑफलाईन निविदा नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक १६/०८/२०२३ ते दिनांक २५/०८/२०२३ (सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत विक्री करिता उपलब्ध आहेत. नमुद केल्या प्रमाणे अटी व शर्ती च्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारानी आपल्या फर्मची सर्व दस्ताऐवज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे ह्या नोटीसच्या दिनांकापासून ग्रा.पं.कार्यालयात दिनांक २५/०८/२०२३ ला सायंकाळी-४.०० वाजेपर्यंत. ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असून निविदा बाबत इतर सविस्तर माहिती व काहीही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.


सदर निविदा ही मासीक सभा दिनांक ८/०९/२०२३ ला (शक्य झाल्यास) सर्व संबंधितासमोर उघडण्यात येईल.

**निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.**


| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कामाची अंदाजित किंमत | नमुना-७ निविदा फार्मची किंमत | निविदेसोबत भरावयाची अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग निधी (जि.प.स्तर) अंतर्गत मौजा नवनीतपुर क्र.१ सौ.सुखराबाई सलामे यांचे घराजवळ नवीन हातपंप बसविणे | १२६८९०/- | ५००/- | १२६९/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |

**श्री.पी.एम.पवार**
ग्रामसेवक
ग्रा.पं.नवनीतपुर

**श्री.एम.आर.सारवरे**
सरपंच
ग्रा.पं.नवनीतपुर



# कारच्या धडकेत वाघाचा मृत्यू





**गोंदिया :** गोंदिया–कोहमारा मार्गावरील मुरदोली जंगल परिसरात केटाकारच्या (एमएच ३५,एआर ९३९७) धडकेत वाघ गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी (दि.१०) रात्री १०.३० वाजताच्या सुमारास घडली होती. दरम्यान जखमी वाघाला नागपूर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचारासाठी नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि.११) सकाळी त्याचा मृत्यू झाला.

प्राप्त माहितीनुसार मागील दिवसांपासून मुरदोली जंगल परिसरात टी–१४ या वाघ व त्याच्या बच्छड्यांचा वावर होता. या मार्गावरुन ये–जा करणाऱ्या वाहन चालकांना वाघ आणि त्याच्या बच्छड्याचे दर्शन झाले होते. दरम्यान गुरुवारी रात्री १० वाजताच्या सुमारास गोंदिया–कोहमारा मार्गावर मुरदोली जंगलातून मुख्य रस्ता ओलांडत असताना भरधाव कारने वाघाला धडक दिली होती. यात वाघ जखमी झाला होता. दरम्यान जखमी झालेल्या वाघावर उपचार करण्यासाठी त्याला जेरबंद करण्याची मोहीम वन्यजीव विभागाकडून शुक्रवारी (दि.११) पहाटेपासून शोध मोहीम राबविण्यात आली.

सकाळी ७:३० वाजता जखमी वाघाला जेरबंद करण्यात वन्यजीव विभागाला यश आले. दरम्यान त्याला जेरबंद करुन उपचारासाठी नागपूर येत नेत असताना त्याचा कोहमाराजवळ वाटेतच मृत्यू झाल्याची मानद वन्यजीव रक्षक सावन बहेकार यांनी सांगितले. मृतक वाघाचे शवविच्छेदन नागपूर गोरेवाडा येथे करण्यात येणार असून तिथेच दफन केले जाणार आहे.

### गंभीर जखमी झाल्यानेच वाघाचा मृत्यू

**कारच्या धडकेत गंभीर जखमी झाल्यामुळे तो फारशी हालचाल करु शकत नव्हता. त्यामुळे हा वाघ अपघात झाला त्या ठिकाणापासून ५० मीटर अंतरावर वन्यजीव विभागाला रेस्क्यू दरम्यान सापडला. शुक्रवारी सकाळी ७:३० वाजता रेस्क्यू करुन उपचारासाठी नागपूर येत नेत असताना ८:३० वाजताच्या सुमारास जखमी वाघाचा मृत्यू झाल्याचे झाला.**

### रेस्क्यूमध्ये यांचा सहभाग

**वन विभागाचे उपवसंरक्षक प्रमोद पांचभाई, विभागीय अधिकारी अतुल देवकर, मानद वन्यजीव रक्षक सावन बाहेकर, सहायक वनंरक्षक राजेंद्र सदगिर, वनपरिक्षेत्र अधिकारी रवी भगत,पशुसंवर्धन अधिकारी अनिकेत चिचावणे, आरआरटी साकोली व नवेगावबांध चमूचा सहभाग होता.**

### उपाययोजना करण्याची गरज

**मुरदोली परिसरात नेहमी वाघ व इतर वन्यप्राण्यांचा वावर असतो. या परिसरात हायवेमुळे नेहमी वन्यप्राणी मृत्यूमुखी पडतात. हा मार्ग नागझिरा–नवेगाव कॉरिडॉर मधील पूर्व नागझिरा परिसरातून जातो आहे. त्यामुळे या ठिकाणी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे मानद वन्यजीव रक्षक सावन बहेकार यांनी मटा शी बोलताना सांगितले.**

# जिल्ह्यातील ३७ राईस मिलर्सला तीन वर्षांकरिता काळ्या यादीत

**गोंदिया :** निकृष्ट तांदळाचा पुरवठा केल्याप्रकरणी गोंदिया जिल्ह्यातील ३७ राईस मिलर्सला तीन वर्षांकरिता काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केली, तर यापूर्वीदेखील देवरी तालुक्यातील सात राईस मिलर्सला तीन वर्षांकरिता काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

गोंदिया जिल्ह्यात तांदूळ जमा करताना येथील तांदूळ गुणवत्ता अधिकारी तांदळाची गुणवत्ता तपासून तांदूळ गोदामात जमा करतात; परंतु जमा केलेला हा तांदूळ दुसऱ्या जिल्ह्यात गेल्यावर केंद्रीय पथकाच्या तपासणीत मानवास खाण्यास योग्य नसल्याचे तपासात उघड झाले आहे. यामुळे गोंदिया जिल्ह्यात दुसऱ्या टप्प्यात ३३ राईस मिलर्सला तीन वर्षांसाठी काळ्या यादीत टाकण्यात आले. यासंदर्भातील पत्र जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी ४ ऑगस्टला दिले आहे.

गोंदिया जिल्हा मार्केटिंग फेडरेशन तसेच आदिवासी विकास महामंडळाने गोंदिया जिल्ह्यात खरेदी केलेल्या शासकीय धानाची भरडाईकरिता गोंदिया जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांतील राईस मिलर्सबरोबर करार केला जातो, पण राईस मिलर्सला भरडाईसाठी दिलेल्या धानाची काही राईस मिलर्स भरडाई न करता इतर राज्यांत धानाला जास्त भाव मिळत असल्याने त्या धानाची विक्री करतात. उत्तर प्रदेश राज्यातील तांदूळ विकत घेत गोंदिया जिल्ह्यात सीएमआरच्या नाव–ावर अधिकाऱ्यांच्या संगनमताने जमा करीत असल्याचे पुढे आले आहे. हाच तांदूळ स्वस्त धान्य दुकानात ग्राहकांना देण्यासाठी बाहेर जिल्ह्यात पाठविला जातो.

स्वस्त धान्य दुकानात देण्यात येणारा तांदूळ हा खाण्यास योग्य आहे किंवा नाही याची जबाबदारी एफसीआयच्या केंद्रीय पथकाची आहे. केंद्रीय पथक जिल्ह्या–तील स्वतः धान्य दुकानांना पुरविण्यात येणा?या किंवा राईस मिलर्सकडून जमा केलेला तांदूळ गोदामात जाऊन पाहणी करतात. गोंदिया जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांतही जमा करण्यात आलेल्या तांदळाची गुणवत्ता केंद्रीय पथक तपासणी करीत असताना जिल्ह्यातील तब्बल ३३ राईस मिलर्सनी पाठविलेला तांदूळ निकृष्ट दर्जाचे असल्याचे सांगत त्या राईस मिलर्सला तीन वर्षांसाठी काळ्या यादीत टाकले आहे.



### गुणवत्ता अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

**तांदूळ गुणवत्ता अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गोंदियात हाच तांदूळ चालतो, तर तो तांदूळ बाहेरच्या जिल्ह्यात गेल्यावर खाण्यायोग्य राहात नाही. गोंदियातही खाण्यायोग्य तांदूळ नाही; परंतु पुरवठा विभागाच्या मूकसंमतीने खाण्यायोग्य नसलेला तांदूळ सर्रास दिला जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.**

### इतर जिल्ह्यांत पाठविलेला तांदूळ खाण्यायोग्य नाही

**गोंदिया जिल्ह्यातील ३३ राईस मिलकडून विविध जिल्ह्यांत तांदूळ पाठविण्यात आला. त्यात बीड जिल्ह्यात पाठविलेल्या तांदळापैकी ३ राईस मिलर्सचा तांदूळ निकृष्ट आहे. लातूर जिल्ह्यात पाठविलेल्या तांदळात ११ राईस मिलर्सचा तांदूळ निकृष्ट आहे. नंदुरबार जिल्ह्यात पाठविलेल्या तांदळापैकी १० राईस मिलर्सचा तांदूळ निकृष्ट आहे.**

### ६ आठवड्यांत तांदूळ जमा करा, अन्यथा फौजदारी कारवाई

**निकृष्ट दर्जाचा तांदूळ पुरविणाऱ्या त्या ३३ राईस मिलर्स चालकांनी पाठविलेला तांदूळ निकृष्ट दर्जाचा पाठविला. त्याऐवजी उत्कृष्ट तांदूळ येत्या ६ आठवड्यांत जमा करावा, अन्यथा त्या राईस मिलर्सवर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.**

**– चिन्मय गोतमारे,** जिल्हाधिकारी गोंदिया.

### या राईस मिलवर झाली कारवाई

**धर्मा राईस मिल बटाना, दादीजी इंडस्ट्रीय सावरी, आशुतोष फुड्स गणखैरा, जय दुर्गा राईस मिल गोरेगाव, दादीजी ॲग्रो गोरेगाव, सिद्धीविनायक राईस मिल तेढा तुमसर, गुप्ता राईस इंड, तुमखेडा, दादी माँ राईस मिल गणखैरा, जयदुर्गा राईस मिल शहारवानी, माँ गायत्री ॲग्रो इंड डव्वा, रामदेव ॲग्रो प्रोडक्ट अर्जुनी मोरगाव, संजय राईस मिल अर्जुनी मोरगाव, ईश्वर राईस मिल महागाव, शारदा राईस मिल अर्जुनी मोरगाव, रामदेवबाबा राईस मिल कनेरी, बालाजी राईस मिल नवेगावबांध, सहकार राईस मिल कवलेवाडा, तिरुपती राईस मिल गणखैरा, गुरुकृपा पेंडी प्रोसेसर डव्वा, कोमल राईस मिल गोंदिया, गजानन राईस मिल ॲड पोहा मिल गोंदिया, गुरुदेव बहादूर राईस मिल रतनारा, चिलाचे बंधू राईस मिल सरांडी, ज्योती राईस मिल सरांडी, डी.जी.स्टीम सुखदेवटोली, तिरुपती सॉरटेक्क गोंदिया, पराग राईस मिल गोंदिया, पार्थ ॲग्रो व्हिजन गोंदिया, प्रल्हाद राईस मिल गोंदिया, गणेश राईस मिल सावरी, सहयोग राईस मिल पांढराबोडी, अन्नपूर्णा ॲग्रो इंडस्ट्रीय खातिया, साईबाबा राईस मिल, गांधी राईस मिल, न्यू शक्ती राईस मिल, चिंतामणी राईस मिल, गजानन राईस मिल, फुलचंद राईस मिल गोंदिया आदिंचा समावेश आहे.**

# मेरी माटी मेरा देश उपक्रमा दरम्यान स्वातंत्र्य सेनानी परिवाराचा सत्कार

## गोंदिया जिल्ह्यातून नऊ मातीचे कलस दिल्लीला पाठविण्यात येणार




**गोंदिया:** मेरी माटी मेरा देशा या केंद्र शासनाच्या उपक्रमांतर्गत गोंदिया जिल्ह्यातील नगर परिषद गंदिया द्वारा आयोजित करण्यात आलेल्या सगळ्यांनी माती आणि दिवे हातात घेऊन शपथ घेतली व कार्यक्रमाचे वैशिष्टय म्हणजेच यामध्ये स्वातंत्र्य संग्राम सेनानी यांच्या परिवारांचा स्वागत करुन नगर परिषदेच्या कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. या कार्यक्रमांतर्गत गोंदिया जिल्ह्यातून मातीचे ९ कलस दिल्ली येथे पाठविण्यात येणार आहेत. त्यात सर्व ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका क्षेत्रातून माती संकलित केली जात असून लवकरच हे कलश दिल्ली येथे पाठवणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. सदर कलश हे नेहरु युवा केंद्रचे व्हॉलंटीअर दिल्लीला घेऊन जाणार आहेत.

मेरी माटी मेरा देश या उपक्रमात नगरपरिषदेत स्वातंत्र्य संग्राम सेनानी यांच्या परिवाराचा स्वागत सत्कार करुन एक अनोखा कार्यक्रम साजरा केला. त्यामुळे स्वातंत्र्य संग्राम सेनानी परिवाराच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला असून गोंदिया जिल्ह्यातील पन्नालाल दुबे, बिहारी लाल दुबे या स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांनी त्या काळात केलेल्या कार्याची आणि जेलमध्ये राहून केलेल्या उपक्रमाची आठवण त्यांच्या परिवाराला झाली. त्यांनी सुद्धा नगरपरिषदेच्या या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या आणि आभार मानले.

सदर कार्यक्रमाला जिल्हाधिकारी चिमन्य गोतमारे, आमदार विनोद अग्रवाल तसेच नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक करणकुमार चव्हाण तसेच स्वातंत्र्य संग्राम सेनानी यांच्या परिवारातील अनिल गौतम, प्रभा विरेंद्रनाथ पुरी, विनयकुमार मिश्रा, विजयकुमार गुप्ता, गार्गादेवी परमार, प्रतिभा रमेशचंद्र दुबे तसेच नगर परिषद गोंदियाच्या अधीपत्याखालील सर्व माध्यमिक, प्राथमिक शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी तसेच नगर परिषद संपूर्ण कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात स्वातंत्र्य संग्राम सेनानी पन्नालाल दुबे यांनी सुन प्रतिभा रमेशचंद्र दुबे यांच्या हातून ध्वजारोहण करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संदेश असलेले तसेच स्वातंत्र्यसंग्रामात प्राणाची आहूती देणाऱ्या वीरांना मानवंदना म्हणून तयार करण्यात आलेले शीलाफलकचे अनावरण मान्यवरांच्या हातून करण्यात आले.

# संभाजी भिडे यांच्या विरोधात माळी समाजाचे धरणे आंदोलन




**सडक अर्जुनी:** महात्मा ज्योतिबा फुले, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विरोधात अभद्र, वक्तव्य करणाऱ्या संभाजी भिडे उर्फ मनोहर कुलकर्णी यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना त्वरित अटक करण्यात यावी या मागणीसाठी माळी समाजाच्यावतीने स्थानिक तहसील कार्यालयासमोर शुक्रवार (दि.१२) धरणे आंदोलन करण्यात आले. संभाजी भिडेचा जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी महात्मा फुले माळी समाज शिक्षण संस्था, माळी समाज सौंदड, ओबीसी संघटना, बहुजन आघाडीचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच समाजबांधवांनी धरणे आंदोलन केले. याप्रसंगी सदुभाऊ विठ्ठले, गायत्री इरले, देवचंद तरोणे, चरणदास शहारे, मदन साखरे, रविदास टेंभुर्णे, विवेकानंद राऊत, दिनेश हुकरे, निशांत राऊत, राजेश नंदागवळी, सोविंदा निर्वाण, संजय बनकर, नारायण सावरकर, नंदकिशोर डोंगरवार, दिलीप डोंगरवार, ग्रामपंचायत सदस्य कैलाश इरले, केदार इरले, वसंता विठ्ठले, देव–ाजी बनकर, निकेत गुरनुले, विनोद कावळे, राजेंद्र जनबंधू, मनोहर गोटेफोडे, शंकर गोटेफोडे, धनराज डोंगरवार उपस्थित होते.

(पान १ वरुन)– जिल्हा पर्यटन विकास समिती तसेच नॅशनल ?डव्हेंचर फाऊंडेशन नागपूर व गोंदिया वन विभाग अंतर्गत नवाटोला संयुक्त वनव्यवस्थापन समिती नवाटोला यांचे संयुक्त विद्यमाने हाजराफॉल या नैसगीक पर्यटन स्थळाचे विकासाचे कार्य करुन २६ युवक व २२ युवती असे एकूण ४८ स्थानिक होतकरु व प्रशिक्षीत युवक–युवतींना रोजगार प्राप्त झालेला आहे. सन २०२२–२३ मध्ये २३ हजार ८९४ पर्यटकांनी भेट दिली असून त्यांचेकडून २४ लाख ६३ हजार २६० रुपये महसूल प्राप्त झालेला आहे.

यासोबतच जिल्ह्यात जिल्हा परिषद कृषी विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, वन विभाग, पोलीस प्रशासन, महसूल विभाग, समाज कल्याण, आदिवासी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, कौशल्य विकास विभाग व इतर सर्व विभागामार्फत सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय व लोककल्याणकारी योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यात येत आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचा आज सांगता समारोप असून केंद्र शासनाच्या ङ्गमेरी माटी–मेरा देशफ अभियानास जिल्ह्यातील नागरिकांनी लोकचळवळीचे स्वरुप देवून हे अभियान यशस्वी करावे, असे ते म्हणाले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात सर्वसामान्य नागरिकांचा विकास व जिल्ह्याची प्रगती हेच प्रशासनाचे ध्येय आहे. सर्वांगिण विकासासाठी कटिबध्द होऊन जिल्हा अग्रेसर ठेवूया असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी ध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. पुरुष व महिला पोलीस दल, पुरुष व महिला होमगार्ड पथक, माजी सैनिक दल, पोलीस बँड पथक, पोलीस श्वान पथक, अग्नीशमन दल यांनी परेड संचलन केले. कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (रोहयो) चंद्रकांत खंडाईत, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, अधिष्ठाता डॉ.कुसुमाकर घोरपडे, तहसिलदार समशेर पठाण, अपर तहसिलदार विशाल सोनवणे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी करण चव्हाण यांचेसह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, पत्रकार बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती मंजुश्री देशपांडे यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला.

# १० वर्षांत नाट्यगृहाची किमंत १२ वरुन २४ कोटीवर पोचली,३० टक्के काम अजूनही अपूर्ण



**गोंदिया :** जिल्ह्यातील कलावंतांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि त्यांना आपली कला व प्रतिभा समोर आणण्याची संधी मिळावी, हा उदात्त हेतू समोर ठेऊन जिल्ह्यात एक नाट्यगृह उभारण्याचे नियोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने शहरातील रेलटोली येथे नाट्यगृह उभारण्याकरिता निधी मंजूर करण्यात आला. मात्र, गेल्या १० वर्षांपासून नाट्यगृहाचे बांधकामच पूर्ण होऊ शकले नाही. यामुळे "कुणी नाट्यगृह देता का नाट्यगृह," अशी आर्तहाक देण्याची वेळ आता जिल्ह्यातील कलावंतांवर आली आहे. येथील कलावंतांना नाट्यगृहाची तर नाट्यगृहाला निधीची प्रतीक्षा आहे.

गेल्या १० वर्षांपासून गोंदिया नगरपरिषदेतर्फे या नाट्यगृहाचे काम सुरू आहे. २०१२ साली सांस्कृतिक विभागाच्या निधीतून नाट्यगृह उभारण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. या बांधकामासाठी शासनाने १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन नगर परिषद प्रशासनाला दिला. मात्र, अद्याप हे बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही.आजच्या घडीला या नाटयगृहाची बांधकामाची किमंत २४ कोटी रुपयावर पोचल्याचे नगरपरिषदेचे म्हणने आहे.

नगर परिषद प्रशासन निधीच्या कमतरतेमुळे नाट्यगृहाचे बांधकाम रखडल्याचे सांगून हात वर करीत आहे. सध्या जवळपास ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यासाठी शासनाकडे अधिक निधीची मागणी करण्यात आली आहे. मात्र अद्याप निधी मिळालेला नाही. त्यामुळे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. या लेटलतिफीमुळे २०१२ मध्ये जे बांधकाम १२ कोटी रुपयांत होणार होते, त्यासाठी आता २४ कोटींचा खर्च येणार आहे.

### काँग्रेसच्या सत्ताकाळात पायाभरणी

**२०१२ मध्ये काँग्रेसच्या सत्ताकाळात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते या नाट्यगृहाच्या बांधकामाची पायाभरणी करण्यात आली होती. मात्र, १० वर्षांपेक्षा अधिकचा काळ लोटूनही त्याचे बांधकाम अद्याप पूर्ण होऊ शकले नाही.**

### नगर परिषद प्रशासन म्हणते:

**गोंदिया नगर परिषद प्रशासनाने १४ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. यापूर्वी १२ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. वाढीव निधी मिळाल्यास उर्वरित बांधकाम लवकरच पूर्ण होईल. सुमारे ७० टक्के काम सध्या झाले आहे, असे नगर परिषदेचे मुख्याधिकारी करण चव्हाण यांनी सांगितले.**

# भंडारा–गोंदिया लोकसभा क्षेत्र काँग्रेस लढणार : विजय वडेट्टीवार

## कलावती बांदूरकर प्रकरणी गृहमंत्री लोकसभेत खोटी माहिती देत आहेत – विजय वडेट्टीवार

**गोंदिया:** महाविकास आघाडीत भंडारा–गोंदिया लोकसभा क्षेत्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला होता. मात्र आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडले आहेत. तर गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी भंडारा–गोंदिया लोकसभा क्षेत्रात आगामी निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार देण्याची मागणी केली आहे. तसेच काँग्रेससाठी या मतदारसंघात अनुकुल वातावरण आहे. त्यामुळे या मतदारसंघातून काँग्रेसचा उमेदवार निवडणूक रिंगणात असणार असल्याचे संकेत काँग्रेसचे नेते व राज्याचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी गुरुवारी (दि.१०) गोंदिया येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. स्थानिक विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, प्रदेश महासचिव नामदेव किरसान, पी.जी.कटरे, किसान काँग्रेसचे जितेश राणे, महिला जिल्हाध्यक्ष वंदना काळे व पदाधिकारी उपस्थित होते.

ना. वडेट्टीवार म्हणाले मी उमेदवार ठरवायला नव्हे तर जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे मत जाणून घेण्यासाठी व पक्ष संघटन बळकट करण्यासाठी आलो आहे. पदाधिकाऱ्यांसह चर्चा करुन बूथ कमिट्या, आघाड्या यांची माहिती जाणून घेतली. तसेच सर्वांनीच भंडारा–गोंदिया लोकसभा क्षेत्राची निवडणूक काँग्रेसने लढवावी अशी भूमिका मांडल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. काँग्रेसमध्ये गटातटाचे राजकारण नसून मतभेद असले तरी विचार एक आहे. त्यामुळे आगामी सर्व निवडणुकीत यांचे चांगले परिणाम दिसून येतील असे सांगितले. तसेच ज्यांचा पाय ईडीच्या चिखलात फसला आहे, ज्यांच्यावर घोटाळ्याचे आरोप तेच नेते भाजपमध्ये प्रवेश करीत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. केंद्र व राज्यातील भाजप सरकार सर्वच आघाड्यांवर अपयशी ठरले आहे. केवळ महागाई, बेरोजगारी याशिवाय या सरकारने काहीच दिले नाही. उज्वला योजने अंतर्गत वाटप केलेल्या ९ कोटी गॅस सिलिंडर पैकी ८० टक्के सिलिंडरचे दरामुळे रिफिलिंगच होत नसल्याचे पुढे असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले.

भाजप म्हणजेच अखिल भारतीय खोटारडी पार्टी आहे. या पक्षाचा केंद्रिय गृहमंत्री लोकसभेत कलावती बांदूरकर प्रकरणी तिला भाजपच्या सरकारनी मदत केली असल्याची खोटी माहिती देतात यवतमाळ जिल्हयातील या महिलेला विचारणा केली असता या विधवा महिलेने राहुल गांधी यांनी घरी येवून सांत्वन केल्यानंतरच तीला शासकिय मदत आणि इतर शासकिय मदत मिळाल्याचे सांगीतल्यावरून कळते की यांचे गृहमंत्रीनी लोकसभेत खोटी माहिती पुरवली. या लोकांना खोटं बोलण्याशिवाय काहीच येत नाही. आणि दुसऱ्यांच्या कर्तबगारीवर आपली पाठ थोपटून घेणे हाच भाजपचा धंदा आहे. त्यावर आता जनता विश्वास ठेवणार नाही. यांचे दिवस आता भरलेले आहेत. कलावतींसह निर्भयाच्या भावाला पायलट करण्याचं काम राहुल गांधीनी केलं. निवड आरोप करणे यांच्याव्यतिरिक्त यांच्याकडे काहीच नाही, गेल्या ९ वर्षात उल्लेखनीय अशा कोणताही काम नाही, विकास नाही. लोकसभेत राहुल गांधीनी त्या बाईकडे पाहून नाही तर लोकसभा अध्यक्ष यांच्याकडे पाहून फलाइंग किस दिली. आता ज्या महिला नेत्रींनी आपल्या मैत्रिणींचा घर उद्ध्वस्त केलं त्या स्मृती जुबीन ईराणी या महिलेने आरोप करावे, अश्या आपल्या मैत्रिणींचे घर फोडणाऱ्यांनी राहुल गांधी सारख्या चारित्र्यवान व्यक्तीवर आरोप करणेच मुळीच चुकीचे आहे. बुधवारी राहुल गांधीनी जो धमाका संसदेत विश्वासमतावर आपलं मत मांडतांना केलं त्याला यांना उत्तर देता येत नाही म्हणून आता वा अश्या महिलांना पुढे करून त्यांना बदनाम करण्याचा घाट रचला आहे. भाजपच्याच खासदार हेमामालिनी ने सुद्धा म्हटले आहे की मी राहुल गांधी यांना अश्या काही करतांनी संसदेत बघितले नाही. आता कुणावर विश्वास ठेवावं. लोकसभेतील विश्वास दर्शक ठरावा संदर्भात बोलतांना वडेट्टीवार म्हणाले की मणिपुर जळत असल्यापासून मौनीबाबांनी मौन पाळले होते त्यांचे मौन उघडावे म्हणून आण–लेलं हे विश्वासदर्शक ठराव आहे. होय आमच्याकडे आकडेवारी नाही अशी कबुली देत ते म्हणाले की मौनीबाबानी मणीपुर प्रकरणी आपले तोंड उघडले पाहिजे. मणिपुरमध्ये ज्याप्रकारे जीवंत महिलांची विवस्त्र करून धिंड काढली जात आहे. विटंबना केली जात आहे है करणारे कोण आणि कुणामुळे अदानी कंपनीला त्या ठिकाणी माईन्स देण्यासाठी तेथील दोन प्रमुख समाजात तिढा निर्माण करून मणिपुर ला जाळण्याचं काम केंद्र सरकार मणिपुरच्या राज्य सरकारच्या मदतीने करीत आहे हे जनतेला कळायला पाहिजे की तेथील या सर्व घटनेचा बोलविता धणी कोण आहे. हा देश अस्थिर करण्याचा काम कोण करीत आहे. मणिपुर पेटविण्याचा काम कुणी केलं या मागे केंद्रातील मोदी सरकार आणि मणिपुर राज्यातील विरनसिंग यांची भाजपची सरकार जवाबदार असल्याचा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला.

### ट्रिपल इंजिन सरकार नव्हे रक्त शोषणारे सरकार

**महाराष्ट्राच्या विकासाला गती देण्यासाठी आधी शिंदे आणि अजित पवार हे सोबत आले आहे. यामुळे महाराष्ट्र विकासाचा वेग या ट्रिपल इंजिनमुळे वेगाने होईल भासविले जात आहे. मात्र प्रत्यक्षात राज्यात या विरोधी चित्र असून हे ट्रिपल इंजिन सरकार नव्हे तर राज्यातील जनतेचे रक्त शोषणारे सरकार असल्याची टिका ना. विजय वडेट्टीवार यांनी केली. जळगाव येथील पत्रकारांवर हल्ला प्रकरणी बोलतांना ते म्हणाले की पत्रकारिता निर्भिडपणे व्हावी. या देशात विचार स्वातंत्र्य आहे. लेखन स्वातंत्र्य आहे. आणि एखादया पत्रकाराने जर सत्य बाजू मांडली तर त्या पद्धतीने त्याला धमकावणं आणि मारण्याचे काम होत असेल तर असे समजावे की या सरकारमधील आमदारांना सत्तेचा माज चढलेला आहे. सत्तेची मस्ती चढलेली आहे. या मस्तीतून हे पत्रकारांना सामान्य माणसांना मारत सुटले आहेत. जनतेनीही यांना आता जशाच तसा उत्तर देण्याची गरज आहे. तरच है सुधारतील हा प्रश्न मी विधानसभेत मांडणार असल्याची ग्वाही ही याप्रसंगी वडेट्टीवार यांनी दिली.**

